# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२२

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक २१ डिसेंबर, २०२२ / अग्रहायण ३०, १९४४ (शके)**

**मुख्यमंत्री } यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७२**

---

## तत्कालीन जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापूर यांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१) * १५१३७ श्री.गोपिचंद पडळकर : तारांकित प्रश्न क्रमांक ११७५२ ला दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तत्कालीन जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापूर यांनी सोलापूर जिल्ह्यामध्ये कोयना, धोम, कन्हेर, वीर अशा विविध धरणाखालील धरणग्रस्तांना दलालामार्फत जमिनी मंजूर करुन त्या जमिनींची दलालामार्फत खरेदी-विक्री केल्याप्रकरणी गैरव्यवहाराची चौकशी करुन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याबाबत RPI (A) चे पदाधिकारी श्री.दिपक चंदनशिवे यांनी आझाद मैदान, मुंबई येथे हिवाळी अधिवेशन २०२१ च्या दरम्यान केलेल्या आंदोलनाच्यावेळी शासनाने दोषींवर कारवाई करण्याचे आश्वासन दिले असूनही अद्याप दोषींवर कोणतीही कारवाई झाली नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, तत्कालीन पुनर्वसन अधिकारी, सोलापूर यांच्या गैरकारभाराची चौकशी करुन कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी वारंवार शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी वाटपासंदर्भात तपासणी करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयाकडून चौकशी समिती नेमण्यात आली आहे, सदर चौकशी समितीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे, चौकशी समितीच्या अहवालात काय निदर्शनास आले आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जमिनी वाटपासंदर्भात दोषी आढळून आलेल्या तत्कालीन जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापूर तसेच तत्कालीन मंडळ अधिकारी यांच्याविरुध्द सुरु असलेली विभागीय चौकशी पूर्ण करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) सोलापूर जिल्ह्यात विविध प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी वाटप करण्यात आलेल्या आहेत. सोलापूर जिल्ह्यातील प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमिनी वाटपासंदर्भात श्री.दिपक चंदनशिवे यांनी दिलेल्या निवेदनातील मुद्यांच्या अनुषंगाने तपासणी करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांच्या कार्यालयाकडून चौकशी समिती नेमण्यात आली होती. त्यानुसार सदर निवेदनातील मुद्दा क्र.१ व ३ मध्ये सकृत दर्शनी तथ्यता दिसून येत आहे. त्यामुळे मुद्दा क्रमांक १-श्री.सखाराम हरी कदम यांना दुबार जमीन वाटप व मुद्दा क्रमांक-३ श्री.वाडकर यांना पर्यायी जमीन वाटप आदेश या दोन्ही प्रकरणी वाटप आदेश रद्द करण्यात आले असून यासंदर्भात संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी प्रस्तावित होती. त्यानुसार तत्कालीन जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापूर तसेच तत्कालीन मंडळ अधिकारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सर्वच जातीतील सफाई कामगारांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबत

**(२) * १५४५४ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या नियुक्तीबाबत वारसा हक्काची अंमलबजावणी पुढे चालू ठेवण्याबाबत दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयामुळे अनुसूचित जातीमधील सफाई कामगार वगळता इतर विविध जाती जमातीच्या सफाई कामगारांच्या वारसांना नोकरीत सामावून घेतले जात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१६ च्या शासन निर्णयामध्ये बदल करण्याबाबत तत्कालीन मा.सामाजिक न्यायमंत्री यांनी दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी विधानसभेमध्ये आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शासन निर्णयाचा पुनर्विचार करून सफाई कामगारांमधील इतर जातीतील कामगारांच्या वारसांना न्याय देण्याबाबत शासन निर्णयामध्ये दुरुस्ती करण्यात येणार आहे काय, याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,
(४) तसेच, सफाई कामगारांच्या प्रश्नांबाबत दिनांक १५ सप्टेंबर, २०२२ रोजी गठीत केलेल्या समितीला शिफारशीसाठी किती कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सफाई कामगारांमधील सर्वच जातीतील कामगारांच्या वारसांना नोकरीत सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
दिनांक ९/३/२०२२ रोजी कोणतेही आश्वासन दिल्याची नोंद आढळून येत नाही.

(३) लाड समितीने केलेल्या शिफारशींनुसार सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती मिळण्याबाबत विविध संघटनांकडून प्राप्त होणाऱ्या निवेदनांच्या अनुषंगाने प्रचलित शासन निर्णयातील तरतुदींमध्ये अधिक सुसूत्रता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याकरीता विविध विभागांनी सफाई कामगारांच्या वारसा हक्काबाबत यापूर्वी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांचे एकत्रिकरण करुन सर्वसमावेशक बाबींचा शासन निर्णय निर्गमित करण्याकरीता प्रस्ताव दिनांक २९/०९/२०२२ रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीत सादर केला असता, सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करावी असा निर्णय झाला.
(४) दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये मा.मंत्रिमंडळ उपसमिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समिती याबाबत निर्णय घेणार आहे.
(५) सदर प्रकरणी दिनांक २१/११/२०२२ रोजी गठीत करण्यात आलेली मा.मंत्रिमंडळ उपसमिती निर्णय घेणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळातील महिला कर्मचाऱ्यांच्या विश्रांतीगृहांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३) * १५७७७ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सार्वजनिक सेवेतील महिला कर्मचाऱ्यांची विश्रांतीगृहे अस्वच्छ असल्याने त्यांचे आरोग्य धोक्यात येऊन अविरत सेवा करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांची गैरसोय होत असल्याने सदरहू महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या हक्काप्रमाणे सुविधा मिळत नसल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई विभागातील मुंबई सेंट्रल, परळ, कुर्ला, उरण व पनवेल येथील महिला कर्मचाऱ्यांची विश्रांतीगृहे वापरण्याजोगी नाहीत, तर अनेक ठिकाणी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय नाही, अशाच विश्रांतीगृहांमध्ये महिला कर्मचाऱ्यांना दिवस काढावे लागत आहेत, अनेक वर्षांपासून विश्रांतीगृहांची ही समस्या कायम असून राज्य मार्ग परिवहन प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सार्वजनिक सेवेतील महिला कर्मचाऱ्यांच्या विश्रांतीगृहांचे नुतनीकरण करुन तसेच अद्ययावत सोयीसुविधा उपलब्ध करुन स्वच्छ ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.
(२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या विश्रांतीगृह, बसेस, स्वच्छतागृह यांच्या नियमित स्वच्छतेकरीता देखरेख ठेवण्यासाठी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली स्वच्छता समिती नेमण्यात आली असून समितीने दर आठवड्याला शासनास अहवाल सादर करण्याबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत.

-----------------

## मौजे मागाठाणे (ता.बोरीवली, जि.मुंबई उपनगर) येथील देवीपाडा, काजूपाडा व केतकीपाडा परिसरात स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत

**(४) * १५१९९ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मागाठाणे (ता.बोरीवली, जि.मुंबई उपनगर) येथील डोंगराळ भागात उंच ठिकाणी वसलेल्या देवीपाडा, काजूपाडा व केतकीपाडा येथे राहणाऱ्या रहिवाशांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत असून याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी करुनही पाणीटंचाई दूर करण्यात आली नसल्याचे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या भांडूप कॉम्प्लेक्स येथील बोरिवली जलकुंभातून बोरिवली विभागाकरीता लागणारा पाणीपुरवठा करण्यात येत असून, पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या पूर्व विभागात डोंगराळ भाग जास्त असल्याने जलकुंभात पाण्याची पातळी ३.२ मीटर पेक्षा कमी असल्याने सुरळीत पाणीपुरवठा करण्यास अडचण निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी कायमस्वरुपी उपाययोजना करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूर केलेल्या १०० घनमीटर शोषण टाकी व उदंचन केंद्राच्या प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू प्रस्तावाची अंमलबजावणी करून मागाठाणे येथील देवीपाडा, काजूपाडा व केतकीपाडा परिसरातील पिण्याच्या पाण्याची समस्या कायमस्वरुपी सोडविण्यासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बोरीवली (पूर्व) येथील देवीपाडा व काजूपाडा तसेच, दहिसर (पूर्व) येथील केतकीपाडा व त्या आजुबाजूच्या परिसराचा बहुतांश भाग संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या वन हद्दीलगत अतिउंच व सखल असा विभागला आहे.

सदर परिसरातील स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींमार्फत पाणी टंचाईच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) बोरीवली जलाशयाची पातळी कमी असल्याने अतिउंचावर असलेल्या देवीपाडा, काजुपाडा व केतकीपाडा या भागास कमी दाबाने पाणीपुरवठा होत होता. याकरीता बोरीवली जलाशयाच्या आऊटलेटची डिग्री वाढवून व चार्जिंगच्या वेळेमध्ये बदल करुन पाण्याचा योग्य तो दाब वाढविण्यात आला आहे. त्यामुळे पाण्याची पातळी ३.२ मीटरपेक्षा कमी असून सुध्दा पाणीपुरवठा योग्य त्या दाबाने करणे शक्य होत आहे.

(३) काजुपाड्यातील उंच परिसरास पाणीपुरवठा करण्यासाठी अभिनव नगर, बोरीवली (पूर्व) येथील महानगरपालिकेच्या नागरी प्रशिक्षण संस्था व संशोधन केंद्राच्या (सी.टी.आय.आर.सी.) आवारात प्रस्तावित १०० घनमीटर ऐवजी १५५ घनमीटर क्षमतेची शोषण टाकी व उदंचन संच व्यवस्था माहे जानेवारी, २०२१ रोजी कार्यान्वित करण्यात आली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सदर परिसरातील स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींमार्फत पाणी टंचाईबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे :-

देवीपाडा :-

- देवीपाडा येथील वनखात्याच्या हद्दीतील व सुमारे ५०० मी. लांब असलेल्या २५० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीवरुन जलजोडण्या देण्यात आल्या आहेत. सदर जलजोडण्यांचा जुडगा काढून व गळती थांबविण्याकरीता १५० मि.मी. व्यासाची नवीन जलवाहिनी कुलुपवाडीपर्यंत कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर नवीन जलवाहिनीवर जुन्या जलजोडण्या स्थलांतरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
- वन विभागाच्या हद्दीतील २५० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीवरील झडप शोधून त्यात फेरफार करण्यात आले आहेत.
- सदर कामे केल्यानंतर पाण्याच्या दाबात वाढ झाली. तथापि, अतिउंच ठिकाणी पाण्याच्या वेळेत वाढ होण्यासाठी दुपारी १२.१५ ते दुपारी १.१५ वाजेपर्यंत विशेष पाणीपुरवठा देण्यात येत आहे.

सद्य:स्थितीत माहे नोव्हेंबर, २०२२ पासून सदर परिसराच्या पाणी पुरवठ्यात एक तासाने वाढ होऊन सकाळी ११ ते दुपारी १.३० पर्यंत (अडीच तास) सुरळीत व योग्य दाबाने पाणीपुरवठा होत आहे.

हनुमान टेकडी व काजुपाडा :-

- हनुमान टेकडी या उंचावरील परिसरास वेळेचे नियोजन करुन पूर्वीपेक्षा १५ मिनिटे वाढ करुन पहाटे ४.४० ते सकाळी ६.३५ दरम्यान 1 तास ५५ मिनिटे योग्य दाबाने व सुरळीत पाणीपुरवठा करण्यात येत आहे.
- काजुपाडा येथील पाटील कंपाऊंड व मस्जिद परिसर व आजुबाजूच्या परिसरात काजुपाडा पंपिंग स्टेशन येथील पंपाद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.
- माने कंपाऊंड परिसरास ग्रॅव्हिटी पाणी पुरवठ्याऐवजी काजुपाडा पंपिंग स्टेशनद्वारे पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे. त्यामुळे सदर परिसरास सकाळी ८.३० ते सकाळी १०.३० दरम्यान योग्य दाबाने व सुरळीत पाणीपुरवठा होत आहे.
- संपूर्ण काजुपाडा परिसरात पाणी पुरवठ्यात आणखी सुधारणा करण्यासाठी झोनिंग करण्याचे प्रस्तावित आहे.

केतकीपाडा :-

सदर परिसरात काही तांत्रिक बदल करुन पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला आहे.

काजुपाडा व केतकीपाडा पसिरात पाणीपुरवठा करण्याकरीता स्वतंत्र शोषण टाकी व उदंचन व्यवस्था अस्तित्वात असल्यामुळे व देवीपाडा येथे विविध उपाययोजना केल्यामुळे तेथील पाणीपुरवठा सुरळीतपणे सुरु आहे. सबब सदर ठिकाणी स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविण्याची आवश्यकता भासत नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील निवासी/अनिवासी आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत

**(५) * १५४५० श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.कपिल पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जाती, नवबौध्द विद्यार्थ्यांसाठी १९ वर्षांपासून अनुसूचित जातीसाठी वर्गवारी केलेल्या १६५ निवासी आश्रमशाळा पात्र ठरल्या असून सदर आश्रमशाळांना नियमितपणे आर्थिक सहाय्य, अनुदान न मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर दुष्परिणाम होत असून राज्यातील निवासी/अनिवासी आश्रमशाळांची अनुदानाअभावी अत्यंत वाईट स्थिती झालेली असून सन २०१९ पासून अद्यापपर्यंत सदर शाळांना अनुदान वितरित करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील निवासी/अनिवासी आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबतची मागणी संबंधित संस्था व संघटनांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शाहु, फुले, आंबेडकर निवासी, अनिवासी आश्रमशाळांना (केंद्रीय आश्रमशाळांना) २०% प्रमाणे वेतन अनुदान वेतनश्रेणीनुसार देण्याबाबत तत्कालीन शासनाने निर्णय घेतला असून सदर निर्णयाचे स्वरुप काय आहे, त्यानुसार किती शाळांतील शिक्षक-कर्मचाऱ्यांना वेतन अनुदान सुरु करण्यात आले आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील निवासी/अनिवासी आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) केंद्राच्या योजनेसाठी शिफारस केलेल्या परंतु केंद्र शासनाकडून अनुदान न मिळणाऱ्या स्वयंसेवी संस्थामार्फत अनुसूचित जातीच्या मुलामुलींकरीता चालविल्या जाणाऱ्या तसेच तपासणी अहवालानुसार अ व ब श्रेणीप्राप्त तसेच असहकार दर्शविलेल्या अशा एकूण १६५ आश्रमशाळांसाठी शाहू, फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी शाळा योजना सुरू करण्याचा व सदर योजनेंतर्गत सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून २०% प्रमाणे अनुदान मंजूर करण्याचा निर्णय दिनांक ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

सदर योजनेंतर्गत अनुदान मंजूर करण्यात आलेल्या १६५ आश्रमशाळांपैकी १६२ आश्रमशाळांचे अहवाल शासनास प्राप्त झालेले असून ३ आश्रमशाळा बंद आढळून आल्याने त्यांचे तपासणी अहवाल शासनास प्राप्त झालेले नाहीत. सदर आश्रमशाळांना अनुदान देण्याबाबत शासनस्तरावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरात महानगरपालिका व मेट्रो क्षेत्रात नागपूर सुधार प्रन्यासची प्राधिकारी संस्था अशी विभागणी करुन कार्यक्षेत्र निश्चित करण्याबाबत

**(६) * १५८९८ श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यास या दोन प्राधिकरण संस्था कार्यरत असल्याने प्रशासनाला अंमलबजावणी करताना कामात अडचणी निर्माण होत असून, स्थानिक स्वराज्य संस्थांना अधिक सक्षम करण्याचे धोरण पंचायतराज विधेयकामध्ये असताना नागपूर सुधार प्रन्यास प्राधिकरणामुळे लोकप्रतिनिधींच्या अधिकारांवर मर्यादा येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यास अशा दोन प्राधिकारी संस्था कार्यरत असल्याने एका संस्थेकडे कर भरायचा व कामासाठी परवानगी दुसऱ्या संस्थेकडे मागावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नागपूर शहराचा नियोजनबद्ध विकास करण्याकरीता शहरामध्ये एकच नियोजन प्राधिकारी असावे, याकरीता नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त करावे किंवा नागपूर शहरात महानगरपालिका व मेट्रो क्षेत्रात नागपूर सुधार प्रन्यासची प्राधिकारी संस्था अशी विभागणी करुन कार्यक्षेत्र निश्चित करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर शहरात महानगरपालिका व मेट्रो क्षेत्रात नागपूर सुधार प्रन्यासची प्राधिकारी संस्था अशी विभागणी करुन कार्यक्षेत्र निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

नागपूर सुधार प्रन्यास व नागपूर महानगरपालिका नागपूर शहराच्या विकासाकरीता वेगवेगळ्या कार्यक्षेत्रात नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत आहेत. नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम,१९३६ च्या कलम ४ नुसार नागपूर सुधार प्रन्यासच्या विश्वस्त मंडळावर १० विश्वस्तांपैकी ३ सदस्य नागपूर महानगरपालिकेचे प्रतिनिधीत्व करतात तसेच शासनाद्वारे नियुक्त १ विधानसभा सदस्य व २ अशासकीय सदस्य यांचा विश्वस्त मंडळामध्ये समावेश आहे. विश्वस्त मंडळाद्वारे घेण्यात येणाऱ्या धोरणात्मक निर्णयामध्ये यानुसार लोकप्रतिनिधीचा सहभाग आहे.
(२) हे खरे नाही.

नागपूर शहराकरीता जरी दोन नियोजन प्राधिकरण अस्तित्वात असले तरी नागपूर सुधार प्रन्यासच्या कार्यक्षेत्रात नियोजन प्राधिकारी म्हणून नागपूर सुधार प्रन्यासद्वारे विकास कामे करण्यात येतात. यामध्ये गुंठेवारी अधिनियमांतर्गत अभिन्यास / भूखंड नियमितीकरण करणे याकरीता आवश्यक शुल्क भरणे, विविध परवानग्या प्राप्त इ.कामांचा समावेश आहे. याकरीता नागपूर सुधार प्रन्यासकडून आवश्यक विकास शुल्क आकारण्यात येते. नागपूर सुधार प्रन्यास अधिनियम,१९३६ च्या कलम ५७ (२) मधील तरतूदीनुसार विकसित करण्यात आलेल्या अभिन्यास / भूखंडाचे देखभाल दुरुस्तीची कामे नागपूर महानगरपालिकेमार्फत करण्यात येतात व अभिन्यासातील भूखंड व त्यावरील बांधकामाकरीता कर वसूली महानगरपालिकेमार्फत करण्यात येते.
(३) हे खरे आहे.
(४) नागपूर शहर विकासाकरीता नागपूर महानगरपालिका व नागपूर सुधार प्रन्यास हे त्यांचे कार्यक्षेत्र अनुसार नियोजन प्राधिकारी म्हणून कार्यरत आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने नायर रुग्णालयाचा आरक्षित भूखंड विकासकास दिल्याबाबत

**(७) * १५०८६ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नायर रुग्णालयाच्या विस्तारासाठी आरक्षित केलेला सुमारे १,५५९ चौरस मीटर भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तत्कालीन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रबरवाला डेव्हलपर्स कंपनीला १४ वर्षांकरिता देण्यात आल्याचे दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेची फसवणूक करणाऱ्या संबंधित विकासक व महानगरपालिकेच्या तत्कालीन अधिकाऱ्यांवर कारवाई करुन सदरहू आरक्षित भूखंडावर रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी धर्मशाळा बांधण्याचे काम हाती घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) आरक्षित केलेल्या सुमारे १,५५९ चौ.मी. भूखंडापैकी ४५६.५२ चौ.मी. (४९१४ चौ.फु.) क्षेत्रफळाचा भूखंड बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाच्या हस्तांतरण धोरणानुसार तत्कालीन उप आयुक्त (परिमंडळ-१) यांच्या दिनांक १५/०३/२०१३ रोजीच्या मंजुरीन्वये मे. रबरवाला डेव्हलपर्स यांना देण्यात आला आहे.

उर्वरित ११०२.४८ चौ. मी. जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. त्यापैकी सुमारे ६११.०६ चौ.मी. (६५७७.४५ चौ.फु.) क्षेत्रफळाच्या जागेचा वापर नायर रुग्णालयामार्फत गोदाम म्हणून करण्यात येत आहे.

(२) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आली नाही.

सदर आरक्षित भूखंडावर रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी धर्मशाळा बांधण्याचा प्रस्ताव, रस्त्याच्या रुंदीकरणामुळे तसेच सदर जागा नायर रुग्णालयाच्या विस्ताराकरीता आरक्षित असल्यामुळे रद्द करण्यात आला असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अतिवृष्टी तसेच परतीच्या पाऊसामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(८) * १५३८८ श्री.अनिकेत तटकरे, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.महादेव जानकर, श्री.सचिन अहिर, श्री.अरुण लाड, श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.सुधीर तांबे, श्री.रमेश कराड, श्रीमती उमा खापरे, श्री.जयंत पाटील, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.अंबादास दानवे, श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अतिपर्जन्यवृष्टी, परतीचा पाऊस, महापूर व ढगफुटीमुळे माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत ३४ जिल्ह्यांतील ३८ लाख ४४ हजार ८२६ हेक्टरवरील विविध पिकांचे नुकसान झाले असून कोकण, मराठवाडा, विदर्भ, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र तसेच सिंधुदुर्ग, कोल्हापूर, परभणी, वर्धा, अकोला, यवतमाळ जिल्ह्यात तसेच मंठा व परतूर (जि.जालना) तालुक्यात, लाखांदूर (जि.भंडारा) तालुक्यात, मावळ (जि.पुणे) तालुक्यात मुसळधार पाऊसामुळे शेतकऱ्यांच्या सोयाबीन, कापूस, भात, भुईमूग, धान, कडधान्य, भाजीपाला, फळपिकांचे, बागायतदार शेतकऱ्यांचे, मच्छिमारांचे, घरांचे व गोठ्यांचे नुकसान झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना कोणत्याही अटी व निकष न लावता सरसकट शासकीय आर्थिक मदत देण्याची मागणी परभणी जिल्ह्यातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, तसेच मंठा व परतूर (जि.जालना) तालुक्यात सन २०१९-२०२२ च्या खरीप हंगामात शेतीसह खरीप पिकांचे नुकसान झाल्याने ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना सरसकट अनुदान देऊन आर्थिक मदत देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांच्या कापणीला आलेल्या पिकांचे नुकसान झाल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात आला असून अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे शासनाने पंचनामे/पाहणी/चौकशी केली आहे काय, राज्यातील शेतकऱ्यांचे किती रुपयांचे नुकसान झाले आहे, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने हेक्टरी किती आर्थिक मदत जाहीर केली आहे,

(४) असल्यास, राज्यात दिनांक १ ते २२ ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे ६ लाख ३४ हजार हेक्टर वरील पिकांचे नुकसान झालेले असून १९ जिल्ह्यातील मदतीचे प्रस्ताव विभागीय आयुक्तांकडून मदत व पुनर्वसन विभागाला माहे ऑक्टोबर, २०२२ अखेर पर्यंत प्राप्त झालेले नाहीत तसेच अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या व निकषात न बसणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये ७५५ कोटींचा निधी वितरित करण्याबाबतचा निर्णय विशेष बाब म्हणून मा.मंत्रिमंडळ उप समितीच्या बैठकीत घेण्यात आला असून सदरहू शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यास जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने निकषात न बसणाऱ्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात रक्कम जमा झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यात अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीची रक्कम जमा न करणाऱ्या व कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर कारवाई करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) खरे आहे.

(२) खरे आहे.

(३) अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी विहित कार्यपध्दतीनुसार जिल्हाधिकारी यांच्याकडील यंत्रणेमार्फत पंचनामे करण्यात आलेले आहेत. विभागीय आयुक्त यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार अतिवृष्टीमुळे राज्यातील अंदाजे ३६.३८ लक्ष हेक्टर इतके क्षेत्र बाधित झाले आहे.

शासन निर्णय, महसूल व वन विभाग, दिनांक २२/०८/२०२२ अन्वये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषापेक्षा वाढीव दराने ३ हेक्टरच्या मर्यादेत पुढीलप्रमाणे शेतीपिकांच्या नुकसानीकरीता मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

- जिरायत पिकांच्या नुकसानीसाठी रुपये १३,६००/- प्रति हेक्टर,
- बागायत पिकांच्या नुकसानीकरीता रुपये २७,०००/- प्रति हेक्टर,
- बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी रुपये ३६,०००/- प्रति हेक्टर

त्यानुसार, चालू हंगामातील अतिवृष्टीमुळे बाधित क्षेत्राकरीता रुपये ५४३९.०७ कोटी इतका निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(४) खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत

**(९) * १५५७७ श्री.सुरेश धस, श्री.अंबादास दानवे : तारांकित प्रश्न क्रमांक १४५४९ ला दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र विधिमंडळाने एकमताने मंजूर केलेला मराठा समाजाला आरक्षण देणारा कायदा व मा.उच्च न्यायालयाने मान्य केलेल्या मराठा आरक्षणाची बाजू मा.सर्वोच्च न्यायालयात मांडण्यात महायुतीचे शासन अपयशी ठरले असल्याने केंद्र शासनाचे आर्थिक मागासचे (E.W.S) मराठा समाजाचे आरक्षणही रद्द झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात मराठा समाजाचे आरक्षण मा.सर्वोच्च न्यायालयाने नाकारले असल्याने मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी पुन्हा राज्यात मोर्चे काढण्यात येणार असल्याचे विविध संघटनांकडून जाहीर करण्यात येत असून शिरुर (पुणे) येथे मराठा समाजाने आरक्षण व विविध मागण्यांसाठी दिनांक ३ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मराठा समाजाला आरक्षण देऊन न्यायहक्क देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५/५/२०२१ रोजी एसईबीसी आरक्षण अधिनियम, २०१८ रद्द ठरविल्यानंतर एसईबीसी मराठा प्रवर्गातील उमेदवारांना दिनांक ३१/०५/२०२१ च्या शासन निर्णयान्वये (EWS) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक अथवा अराखीव प्रवर्गाचा विकल्प देण्यात आलेला असून त्याअनुषंगाने घेतलेल्या निर्णयास स्थगिती नाही अथवा रद्द झालेला नाही.

(२) हे खरे नाही.

शिरुर (पुणे) येथे मराठा समाजाचे आरक्षणाकरीता विविध मागण्यांसाठी दिनांक ३ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास आंदोलन झाले हे खरे नाही.

तथापि, त्याअनुषंगाने मराठा समाज संघटनेतर्फे सांगली जिल्ह्यात मराठा क्रांती मोर्चाचे वतीने दिनांक १७/११/२०२२ रोजी मराठा सेवा संघ, सांगली येथे मराठा आरक्षण परिषदेच्या आयोजनासाठी बैठक पार पाडली. तसेच उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब आणि परंडा या ठिकाणी महामोर्चे निघाले होते.
(३) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ५/०५/२०२१ च्या निर्णयान्वये एसईबीसी आरक्षण अधिनियम, २०१८ रद्द केल्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरुध्द पुनर्विलोकन याचिका दाखल करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता यांना सेवानिवृत्तीनंतरचे लाभ देण्याबाबत

**(१०) * १५९४४ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ११६११ ला दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) येथील सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता, श्री.प्रमोद कुलकर्णी यांना सेवा उपदान व सातवा वेतन थकबाकी, स्मार्ट सिटी थकीत पगार बाबतचे लाभ मिळणेबाबत मा.लोकप्रतिनिधी, परभणी यांनी सन २०२२ मध्ये वा त्यादरम्यान प्रधान सचिव, नगरविकास विभाग, मुंबई यांच्याकडे लेखी पत्र सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवर सचिव, नगरविकास विभाग (न.वि.-२८) यांनी आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांना दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ च्या पत्रानुसार प्रस्तावास मान्यता दिली आहे काय,
(३) असल्यास, आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी पुढील सर्व प्रक्रिया पूर्ण करुन सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता (श्री.कुलकर्णी) यांना सर्व लाभ दिले आहेत काय, याबाबत थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता यांना सेवानिवृत्तीनंतरचे सर्व लाभ देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) • श्री.प्रमोद कुलकर्णी, कार्यकारी अभियंता, हे दिनांक २८/०२/२०१९ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले आहेत.

- श्री.कुलकर्णी यांच्या कार्यकारी अभियंता पदावरील पदोन्नतीस सर्वसाधारण सभेची मान्यता नसल्याचे लेखापरीक्षा विभागाने आक्षेप नोंदविले होते.
- त्यासअनुसरुन आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी श्री.कुलकर्णी यांना कार्यकारी अभियंता या पदावरील पदोन्नतीसाठी दिनांक २०/०२/२०१९ रोजी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सर्वसाधारण सभेपुढे सादर केलेल्या प्रस्तावास, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन, कलम १(स) मधील तरतूदीनुसार शासनास प्राप्त अधिकारान्वये दिनांक २१/१०/२०२२ रोजी शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

- श्री.प्रमोद कुलकर्णी यांना दिनांक ०१/०३/२०२० पासून पदोन्नती संदर्भात अंतिम निर्णय होईपर्यंतच्या कालावधीकरीता तात्पुरते निवृत्तीवेतन लागू करण्यात आलेले आहे.
- श्री.कुलकर्णी यांच्या खाती जमा असलेले भविष्य निर्वाह निधी/अर्जित रजा रोखीकरणाची पूर्ण रक्कम अदा करण्यात आलेली आहे.
- श्री.कुलकर्णी यांच्या पदोन्नती संदर्भात शासन मान्यता मिळाली असल्याने, सेवाउपदान, अंशराशीकरण/निवृत्तीवेतन रक्कमेचे ७ व्या वेतन आयोगानुसार प्रगणन करुन अदा करण्याची कार्यवाही महानगरपालिका स्तरावर सुरु आहे.
- श्री.कुलकर्णी यांच्या स्मार्ट सिटी पगाराबाबतचे लाभ देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, स्मार्ट कल्याण-डोंबिवली डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्याकडून माहिती घेऊन पगाराची बाकी रक्कम अदा करण्यात येणार असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीयांच्या महामंडळावर भा.प्र.से. संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत

**(११) * १५९९९ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ, संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ या मागासलेल्या समाजांच्या कल्याणासाठी असलेल्या महामंडळांचे व्यवस्थापकीय संचालक पद हे नियमावलीनुसार भा.प्र.से. संवर्गातील अधिकाऱ्यांकडे देणे आवश्यक असताना सदर पदी उपसचिव, सहसचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची नियुक्ती केल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामंडळावर भा.प्र.से. संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या नसल्याने महामंडळाच्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मागासवर्गीयांच्या महामंडळावर भा.प्र.से. संवर्गातील अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदी भा.प्र.से. संवर्गाचे व्यवस्थापकीय संचालक आहेत, तसेच संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदी सहसचिव दर्जाच्या व्यवस्थापकीय संचालकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोरोनामुळे मृत्यू झालेल्या राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरी व अर्थसहाय्य देण्याबाबत

**(१२) * १५४१५ श्री.जयंत पाटील, प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १०३१४ ला दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना कालावधीत राज्य परिवहन महामंडळाच्या ३१३ कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाला असून महामंडळाकडे एकूण वारसांच्या नोकरी करीता २५४ अर्ज दाखल झाले त्यापैकी ३३ वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांची संख्या २७, पर्यवेक्षकीय पदांमध्ये कार्यवाही सुरु असलेले ३०, शिक्षणाकरीता हक्क राखून ठेवलेले प्रकरणे ८४, कागदपत्रे अपूर्ण असल्याने कार्यवाही सुरु असलेल्या प्रकरणांची संख्या ८५, तसेच नोकरी करीता अपात्र ठरलेल्यांची संख्या ७ आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच रुपये दहा लाखांचे आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी महामंडळाकडे ३४ अर्ज आले असून त्यापैकी फक्त ६ जणांना रुपये दहा लाखांचे आर्थिक सहाय्य मिळाले आहे तर २६ वारसदार आर्थिक सहाय्याच्या प्रतिक्षेत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोरोनामुळे मृत्यू झालेल्या राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वारसांना नोकरी व अर्थसहाय्य देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दिनांक ३०/११/२०२२ रोजीपर्यंत कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मृत्यू पावलेल्या रा.प.अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या वारसांपैकी २५९ वारसांचे नोकरी मिळणेकरीता अर्ज प्राप्त झालेले असून, ५४ वारसांना नियुक्ती देण्यात आलेली आहे.

(२), (३), (४) व (५) २८ उमेदवार प्रतिक्षा यादीवर आहेत. पर्यवेक्षकीय पदाकरीता १७ अर्जांवर कार्यवाही सुरु आहे. ८४ वारसांनी शिक्षण चालू असल्याने, नोकरीचा हक्क राखून ठेवला आहे. ७३ प्रकरणांमध्ये कागदपत्रांची पूर्तता केलेली नसल्याने, कार्यवाही सुरु असून, नोकरी करीता अपात्र ठरलेल्यांची संख्या ०३ आहे.

अनुकंपा नोकरी ऐवजी रुपये दहा लाख इतके आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी ३७ अर्ज प्राप्त झाले असून, त्यापैकी ०६ वारसांना आर्थिक सहाय्य देण्यात आले असून, १२ प्रकरणे अंतिम टप्प्यात आहेत. तसेच १४ प्रकरणांमध्ये कागदपत्रांची पूर्तता करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे व ५ अर्ज अपात्र ठरले आहेत.

रिक्त जागांनुसार नियुक्ती देणे व निधीच्या उपलब्धतेनुसार आर्थिक सहाय्य देण्याची कार्यवाही सुरु आहे.

----------------

## गंगापूर व फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यातील कोल्हापूरी बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(१३) * १५३५१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैरागड, शहाजरपूर, महेबुबखेडा, भालगांव, मालुंजा, सिरजगांव, बोलेगांव व बाबरगांव (ता.गंगापूर, जि.औरंगाबाद) या ठिकाणी वैरागड-लासुर ते सावखेडा पर्यंतच्या शिवना नदीवर सन १९९० ते २०१७ पर्यंत उभारण्यात आलेले कोल्हापूरी बंधारे तसेच पार्थी, कबीरखेडा, वडोदवाडी, शेवता व निमखेडा (ता.फुलंब्री, जि.औरंगाबाद) या गावातील गिरणा नदीवरील कोल्हापूरी बंधारे गतवर्षी झालेल्या पुराच्या पाण्यामुळे वाहून गेल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोल्हापूरी बंधारे वाहून गेल्यामुळे गंगापूर तालुक्यातील लाभक्षेत्रातील ४० गावातील दोन हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याचे तसेच फुलंब्री तालुक्यातील शेतकऱ्यांचे सुमारे २१ हजार हेक्टर क्षेत्र बाधित झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत मार्च-२०२२ मध्ये गंगापूर तालुक्यातील बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी रुपये ३०.०० कोटी मंजूर केले असूनही निविदा प्रक्रियेतील दिरंगाईमुळे बंधाऱ्याच्या दुरुस्त्या होऊ शकल्या नाहीत, तसेच शासनाच्या जि.प.सिंचन विभाग व मृद जलसंधारण विभाग यांच्यात समन्वय नसल्याकारणाने फुलंब्री तालुक्यातील कोल्हापूरी बंधाऱ्यांची दुरुस्ती रखडली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गंगापूर व फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यातील कोल्हापूरी बंधाऱ्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

अतिवृष्टीमुळे आलेल्या पुराच्या पाण्यामुळे शिवना व गिरजा नदीवर व एकूण १५ को.प.बंधाऱ्यांच्या नदीतीराचे पार्श्ववहन (Outflanking) झालेले आहे.
(२) अतिवृष्टीमुळे एकूण १५ को.प.बंधाऱ्यांच्या नदीतीराचे पार्श्वहन झाल्यामुळे एकूण ११०६१ सघमी एवढा पाणीसाठा होऊ शकला नाही. त्यामुळे एकूण २१७५ हेक्टर एवढे प्रकल्पीय सिंचन होऊ शकले नाही.
(३) मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत क्षतिग्रस्त झालेल्या उल्लेखित १५ योजनांपैकी ०९ को.प. बंधाऱ्यांच्या दुरुस्ती अंदाजपत्रकास एकूण २९.२५ कोटी रकमेस शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून त्यापैकी ०८ योजनांची दुरुस्ती कामे प्रगतीत असून ०१ योजनेची निविदा कार्यवाही सुरु आहे. उर्वरित ०६ को.प.बंधाऱ्यांची रुपये १६.०७ कोटी रकमेची अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. त्यामध्ये फुलंब्री तालुक्यातील ०४ कामांच्या अंदाजपत्रकांची तांत्रिक तपासणी करुन प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) सदर को.प.बंधारा योजनांपैकी ८ कोल्हापूरी बंधाऱ्यांची दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर असून ०१ योजनेचे काम निविदा स्तरावर आहे. उर्वरित ०६ कामांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यास निविदा कार्यवाहीअंती सर्वच योजनांची दुरुस्ती कामे मार्च २०२३ पुर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील ओशिवरा, पोईसर व दहिसर नदीचे संवर्धन व पुनरुज्जीवन करण्याबाबत

**(१४) * १५२०५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.प्रसाद लाड, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पश्चिम उपनगरातील बोरिवली येथील दहिसर नदीपात्राच्या काठावर असलेल्या गोठ्यातून शेणयुक्त पाणी नदीत सोडण्यात येत असल्याने तसेच अतिक्रमणे, झोपड्यांमधील गाळ यामुळे नदीचे पात्र अस्वच्छ होण्याबरोबरच निर्माण होणाऱ्या मिथेन वायूमुळे परिसरातील नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत, याप्रकरणी येथील नागरिकांनी मा.नगरविकास मंत्री, मा.पर्यावरण मंत्री, मा.पालकमंत्री व बृहन्मुंबई महानगरपालिका आदीकडे मागील अनेक वर्षांपासून सातत्याने तक्रारी करुनही प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच मुंबईतील नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी स्थानिक नागरिकांनी तक्रारी व आंदोलने करुनही नद्यांची स्थिती सुधारण्याबाबत अपेक्षित कार्यवाही झाली नसल्याने दहिसर नदीमधील वाढत्या प्रदूषणाबाबतच्या समस्यांबाबतची तक्रार दिनांक १० ऑक्टोबर, २०२२ रोजी मा.पालकमंत्री, मुंबई उपनगर यांचे पुन्हा निदर्शनास आणून देण्यात आली असून महानगरपालिकेने याप्रकरणी कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची आग्रही मागणी नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई शहर व उपनगरातून वाहणाऱ्या मिठी नदीच्या धर्तीवर ओशिवरा, दहिसर, पोयसर नद्यांना प्रदूषण, सांडपाणी व अतिक्रमणमुक्त करुन या नद्यांचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय, सदर प्रस्तावाचे स्वरुप काय आहे, त्यासाठी अंदाजे किती खर्च येणार आहे व किती कालावधीत नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, सदरहू मुंबईतील पोईसर व दहिसर नद्यांच्या संवर्धन व पुनरुज्जीवनाबाबत शासन लक्ष देत नसल्यामुळे नदीतील प्रदूषणात सातत्याने वाढ होऊन नदीची अवस्था गंभीर बनली आहे, तसेच नदी परिसरात पावसाळ्यात पाणी तुंबण्याचे प्रकार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील ओशिवरा, पोईसर व दहिसर नदीचे संवर्धन व पुनरुज्जीवन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दहिसर नदीलगतच्या परिसरातील तबेल्यातून शेणयुक्त पाणी नदीत सोडण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच, या नदीच्या पात्रालगत असलेल्या श्रीकृष्ण कॉम्प्लेक्स या इमारतीमध्ये कायमस्वरुपी प्रतिबंदद्वार (फ्लडगेट) उभारण्यासाठी महानगरपालिकेमार्फत सदर सोसायटीकडे ना-हरकत पत्राची मागणी करण्यात आली असून ते अद्यापि अप्राप्त आहे.

साईनाथ नगर दहिसर पश्चिम येथील नदीपात्रातील १५५ झोपड्यांची पात्रता निश्चित करुन महानगरपालिकेमार्फत अंतिम परिशिष्ट तयार करण्यात आले आहे. त्यापैकी पात्र ७३ झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याकरीता मे.मन ग्लोबर लिमिटेड, सि.टी.एस. क्र. १४७५, १५५६ ते १५६१, १५६५, १६२५, १६४३ व्हिलेज मिरा, तालुका ठाणे येथे सदनिका उपलब्ध असून त्यांचे पुनर्वसन झाल्यानंतर नदी रुंदीकरणाचे काम करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

मुंबई पश्चिम उपनगरातील बोरीवली येथील दहिसर नदीतील गाळ महानगरपालिकेच्या पर्जन्य जलवाहिन्या विभागामार्फत वेळोवेळी साफ करण्यात येतो. तसेच दहिसर नदीत इतर प्रदूषण करणारे सर्व घटक मिसळून होणारे प्रदूषण टाळण्याकरीता महानगरपालिकेमार्फत हरीत लवादाने घालून दिलेल्या सूचना व निर्देशानुसार दहिसर नदी पुनरुज्जीविकरणाचा प्रकल्प हाती घेण्यात आला असून प्रकल्पाच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे.

(२) दहिसर नदीमधील वाढत्या प्रदूषणाबाबतच्या समस्यांबाबतची तक्रार दिनांक १० ऑक्टोबर २०२२ रोजी मा.पालकमंत्री, मुंबई उपनगर यांना निदर्शनास आणली असता, मा.पालकमंत्री यांनी प्रमुख अभियंता (पजवा) खात्यास आवश्यक सूचना दिल्या आहेत.

(३), (४) व (५) महानगरपालिकेने मिठी नदीच्या धर्तीवर पश्चिम उपनगरातील ओशिवरा, दहिसर व पोयसर नद्यांच्या पुनरुज्जीविकरणाचा प्रकल्प हाती घेतला आहे. दहिसर व पोयसर नद्यांच्या पुनरुज्जीविकरणाकरीता कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. दहिसर नदी प्रकल्पाची कंत्राट रक्कम रुपये २८१.१५ कोटी व पोयसर प्रकल्पाची कंत्राट रक्कम रुपये ११९२.४४ कोटी इतकी आहे. सदर प्रकल्पांतर्गत मलजल प्रक्रिया प्रकल्प बांधणे, मलःनिसारण वाहिनी टाकणे, सेवा रस्ता, पजवा व इंटरसेक्टरची बांधणी इत्यादी कामांचा समावेश करण्यात आला आहे. दहिसर व पोयसर नद्यांच्या पुनरुज्जीविकरणाच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे.

ओशिवरा नदी पुनरुज्जीविकरण प्रकल्पाच्या कंत्राटदार नियुक्तीची बाब मा.सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विदर्भातील शालेय विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र वेळेत मिळत नसल्याबाबत

**(१५) * १५५८७ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके : तारांकित प्रश्न क्रमांक ११८८१ ला दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भातील दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेण्याकरीता जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक असल्याने जात वैधता प्रमाणपत्राकरीता समितीकडून पुरावा म्हणून १९५०, १९६१ व १९६७ चा पुरावा मागत असल्याने विद्यार्थ्यांना वेळेत प्रमाणपत्र मिळत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विदर्भातील विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र सुलभ रितीने मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) माहे ऑगस्ट, २०२० पासून जात वैधता प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया संपूर्णत: ऑनलाईन करण्यात आली आहे. तसेच राज्यातील सर्व जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांमार्फत विशेष मोहिम राबवून विहित मुदतीत प्रकरणे निकाली काढण्यात येतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळातील चालक आणि वाहकांची पदे निर्माण करुन कंत्राटी चालकांना सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत

**(१६) * १५८५८ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडून गत दोन वर्षापासून प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांऐवजी ५००० कंत्राटी चालकांची करण्यात येणारी भरती रद्द करण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१६, २०१७ व २०१९ अंतर्गत निवड झालेल्या चालक कम वाहकाची भरती करण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चालक हे तांत्रिक पद तर वाहक हे लेखा विभागाशी संबंधित पद असताना दोन्ही पदे एकत्र केल्याने चालक कम वाहकांच्या पद निर्मितीमुळे अनेक बेरोजगार युवकांवर अन्याय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्य परिवहन महामंडळामध्ये कंत्राटी चालक म्हणून नियुक्त केलेल्या सर्व कामगारांना कायम करण्याची मागणी परभणी जिल्ह्यातील कंत्राटी चालकांनी माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात शासनाकडे निवेदनाद्वारे केली असून राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये चालक म्हणून नियुक्ती केलेल्या ८०० कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने चालक आणि वाहक ही दोन्ही वेगवेगळी पदे निर्माण करुन भरण्याबाबत तसेच कंत्राटी चालकांनाही कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) कंत्राटी चालकांची नियुक्ती रद्द करण्यात आलेली आहे.
(२) भरती प्रक्रियाबाबतची कार्यवाही नियमानुसार सुरु आहे.
(३), (४), (५) व (६) चालक आणि वाहक या दोन्ही पदातील रिक्त जागा विचारात घेऊन जाहिरात देण्यात येते, त्यामुळे चालक तथा वाहकाच्या पद निर्मितीमुळे बेरोजगार युवकांवर अन्याय होणार नाही.

राज्य परिवहन कर्मचाऱ्यांनी दिनांक २७/१०/२०२१ पासून बेमुदत संप केला. महामंडळाने प्रवाशांची व विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून आपात्कालीन परिस्थितीत, बाह्य संस्थेमार्फत कंत्राटी

चालकांची नियुक्ती केली. दिनांक २२/०४/२०२२ रोजी मा.उच्च न्यायालयाने "कामावर हजर व्हा" असा आदेश दिल्यानंतर संपकरी कर्मचारी कामगिरीवर हजर झाले. सर्व राज्य परिवहन कर्मचारी कामावर हजर झाल्यावर बाह्य संस्थेमार्फत करण्यात आलेली कंत्राटी चालकांची नियुक्ती रद्द करण्यात आली.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(१७) * १५९१८ डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.महादेव जानकर, श्री.अंबादास दानवे, ॲड.अनिल परब, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गतवर्षात १० हजार ८८१ शेतकरी, शेतमजूरांनी आत्महत्या केली असून शेतकरी आत्महत्यांच्या आकडेवारीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकांवर असल्याची माहिती राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवाल (सन २०२१) मधून निदर्शनास आली असून राज्यात नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या घटना माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विदर्भात शेतकरी आत्महत्या करण्याचे प्रमाण सर्वाधिक असून माहे फेब्रुवारी, २०२२ ते सप्टेंबर, २०२२ या कालावधीत विदर्भातील ९६७ पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, तसेच यवतमाळ जिल्ह्यात गत एका महिन्यात ५१ शेतकऱ्यांनी सततच्या नापिकीच्या नैराश्यातून आत्महत्या केल्या असून यवतमाळ जिल्ह्यात दररोज सरासरी दोन शेतकरी आत्महत्या करीत असल्याचे दिनांक ९ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कै.श्री.दशरथ लक्ष्मण केदारी या अल्पभूधारक शेतकऱ्याने कर्जबाजारीपणा व शेतीमालाला बाजारभाव मिळत नसल्याने मा.पंतप्रधान महोदयांना वाढदिवसाच्या शुभेच्छा पत्र लिहून शेततळयात उडी मारुन आत्महत्या केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, तसेच गडचिरोली जिल्ह्यात महापुरामुळे धानाचे नुकसान होवूनही जिल्हा प्रशासनाने दखल न घेतल्याने गडचिरोली तालुक्यातील मुडदा येथील बंडू चौधरी यांनी माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आत्महत्या केली असूनही जिल्हा प्रशासनाने गडचिरोली जिल्ह्यात शेतकरी आत्महत्या झाली नसल्याचे कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी लागवड खर्च, शेतमालास योग्य भाव, सिंचन सुविधा, पीक पध्दतीत बदल, सहज पतपुरवठा, नगदी पिकांसाठी शेतकऱ्यांना तयार करणे, पीक विमा योजनेत सुसूत्रता, शासन-प्रशासन स्तरावरुन शेतकऱ्यांची दखल, इ.बाबी शासनाने अंमलात आणल्या तर शेतकरी आत्महत्या रोखता येतील असे मत शेती अभ्यासकांनी व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शेती पूरक उद्योगाच्या योजनेची अंमलबजावणी करुन शेतकरी आत्महत्या रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत तसेच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

राष्ट्रीय गुन्हे नोंदी शाखा अहवालानुसार, सन २०२१ या वर्षी कृषी क्षेत्रामध्ये देशात एकूण १०,८८१ शेतकरी व शेतमजूरांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यापैकी राज्यात २६४० शेतकऱ्यांच्या व १४२४ शेतमजूरांच्या अशा एकूण ४०६४ (शेतकरी व शेतमजुर मिळून) आत्महत्या झाल्याची नोंद आहे.

माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत राज्यात ४९६ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) अंशत: खरे आहे.

माहे फेब्रुवारी, २०२२ ते सप्टेंबर, २०२२ या कालावधीत विदर्भात शेतकरी आत्महत्यांची एकूण ९९१ प्रकरणे आढळून आली आहेत. त्यापैकी अमरावती विभागात ७४९ व नागपूर २४२ प्रकरणे आढळून आली. यवतमाळ जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये एकूण ३१ शेतकरी आत्महत्यांची प्रकरणे निदर्शनास आली आहेत.

(३) अंशत: खरे आहे.

पुणे विभागातील पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील कै.दशरथ लक्ष्मण केदारी यांनी कर्जबाजारीपणा व शेतीमालाला बाजारभाव मिळत नसल्याने विषारी औषध प्राशन करुन शेततळयात उडी मारुन दिनांक १७/०९/२०२२ रोजी आत्महत्या केली आहे.

मौजा मुडझा बु., जि.गडचिरोली, येथील श्री.बंडू नामदेव चौधरी, वय ४९ वर्षे यांनी दिनांक १४ ऑगस्ट, २०२२ रोजी गळफास लावून आत्महत्या केली. जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी माहे नोव्हेंबर, २०२२ चे मासिक विवरण सादर करताना, माहे ऑगस्ट, २०२२ मधील या मृत्यू प्रकरणाचा समावेश केला आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये माहे जुलै, २०२२ ते सप्टेंबर, २०२२ या कालावधीत उद्भवलेल्या पूरस्थितीमूळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या यादीत श्री.बंडू नामदेव चौधरी यांचे नाव असून त्याकरीता ०.८१ हे.आर. क्षेत्रावरील पीक नुकसानीसाठी रुपये ११,०१६/- इतकी मदत वितरित करण्यात आली आहे.

(४) होय, शेतकरी आत्महत्या या विषयावर अभ्यास करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने विविध संस्था, तज्ञ व्यक्ती व अभ्यासगट यांचेमार्फत अभ्यास केला असून त्यातील शिफारशींप्रमाणे शासनामार्फत उपाययोजना करण्यात येत आहेत.

(५) शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रामुख्याने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

१) शेतकऱ्यांना समुपदेशनाची व प्रबोधनाची आवश्यकता विचारात घेऊन विविध उपाययोजना

२) विशेष मदतीच्या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या विकासासाठी "कृषी समृध्दी" योजनेच्या अनुषंगाने विविध विभागांकडून उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये शेतीपूरक उद्योग, महिला व शेतकरी समूह गट तयार करणे, लघु व सुक्ष्म उद्योग निर्मिती, मार्केट लिंकेज, कुक्कट पालन, मत्स्यबीज व कोळंबी संचयन कार्यक्रम, दुग्धव्यवसाय तसेच रोजगारभिमुख कौशल्य विकास कार्यक्रम राबविणे इत्यादींचा समावेश आहे.

३) शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना मोफत शिक्षणाची योजना यांच्या अंमलबजावणीला गती देणे यासाठी कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची पुनर्रचना करण्यात आली आहे.

४) शेतमालाला हमीभाव, PM-KISAN सारख्या योजनांमार्फत शेतकऱ्यांवरील ताण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

५) सहकार विभागामार्फत दिनांक २७/१२/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना राबविण्यात आली आहे. तसेच अल्पमुदत कर्जाची पूर्णत: परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना पीक कर्जाच्या रकमेवर जास्तीत जास्त रुपये ५०,०००/- पर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याबाबत दिनांक २९/०७/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

६) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र.एससीवाय-१२०५/प्र.क्र.१८९/म-७, दिनांक २३/०१/२००६ अन्वये नापिकी, राष्ट्रीयकृत बँक/सहकारी बँक किंवा मान्यता प्राप्त सावकराकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करु न शकल्यामुळे होणारा कर्जबाजारीपणा व कर्ज परतफेडीचा तगादा या तीन कारणांमुळे आत्महत्या घडली असल्यास संबंधित आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना रुपये १.०० लक्ष इतकी मदत देय आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील साखर कारखान्यांची ऊसतोड मजुर व मुकादमांकडून फसवणूक होत असल्याबाबत

**(१८) * १५९०४ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गाळप हंगाम २००४ ते २०२० या १६ वर्षांच्या कालावधीत राज्यातील ८१ साखर कारखान्यांची ऊसतोड मुकादमाकडून रुपये ३९ कोटी ४६ लाख ८४ हजार ३२२ ची फसवणूक झाल्याचे साखर आयुक्तांनी दिलेल्या माहितीतून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्येक वर्षीच्या गाळप हंगामात ऊसतोड मुकादमांकडून फसवणुकींचे प्रकार घडत असून, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ रोजी प्रशांत भोसले रा.बिंबळे, ता.माढा या वाहन मालकाची मध्य प्रदेशातील ऊसतोड मजुर व मुकादम यांनी हत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ऊसतोड मजुर व मुकादमांकडून होत असलेल्या फसवणुकीच्या प्रकारांवर आळा घालण्याबाबत तसेच ऊसतोड मजुर व मुकादम यांची गोपीनाथ मुंडे ऊसतोड महामंडळाकडे नोंदणी करुन महामंडळामार्फत कारखान्यांना ऊसतोड मजुर पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय.

(२) श्री.प्रशांत भोसले रा.बेंबळे, ता.माढा, जि.सोलापूर हे ऊस उत्पादक शेतकरी असून, ते ऊसतोड मजुर आणण्याकरीता सेंधवा, जि.बडवाणी, मध्य प्रदेश येथे गेले असता त्यांची हत्या झाली आहे. याबाबत सेंधवा, जि.बडवाणी, मध्य प्रदेश येथील पोलीस स्टेशनमध्ये दिनांक ०६/११/२०२२ रोजी FIR दाखल करण्यात आला आहे.

(३) शासन निर्णय दिनांक २१ सप्टेंबर, २०२१ अन्वये ऊसतोड कामगार ज्या ठिकाणी वास्तव्याला आहेत व जे मागील तीन वर्ष ऊसतोड कामगार म्हणून काम करत असतील त्यांची ग्रामसेवकाने विहित नमुन्यात नोंदणी करुन ओळखपत्र देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच शासन निर्णय दिनांक

२८/१०/२०२१ अन्वये राज्यातील ऊसतोड कामगारांच्या सर्वेक्षण/नोंदणीसाठी वेब व मोबाईल ॲप्लीकेशन महाआयटी मार्फत करुन घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ऑनलाईन नोंदणी करीता वेब पोर्टल तयार करण्याची कार्यवाही लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या स्तरावर सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मुंबई शहर, उपनगर आणि पालघर जिल्ह्यासाठी सामाजिक न्याय विभागांतर्गत स्वतंत्र सहायक आयुक्त नेमण्याबाबत

**(१९) * १५३४७ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेष शाळेतील अंध, कर्णबधीर, अपंग शाळेतील शिक्षकांना माहे जानेवारी २०१९ ते २०२२ या कालावधीतील ७ व्या वेतन आयोगाच्या फरकाच्या रकमा तसेच कार्यशाळेतील १० पदांना ७ व्या वेतन आयोगाचे लाभ मिळालेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेष शाळेतील विशेष शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या भरतीसाठी परवानगी मिळत नाही, तसेच विभागाकडे मुंबई शहर, उपनगर आणि पालघर जिल्ह्यासाठी पूर्णवेळ अधिकारी आणि कर्मचारी नसल्यामुळे शिक्षकांना सेवानिवृत्त होऊनही पेन्शन, ग्रॅच्युएटी मिळत नसल्याचे तसेच त्यामुळे शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सामाजिक न्याय विभागाच्या मुंबई शहर, उपनगर आणि पालघर जिल्ह्यासाठी पूर्णवेळ स्वतंत्र सहाय्यक आयुक्त या दर्जाचा अधिकारी नेमण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील दिव्यांगांच्या अशासकीय अनुदानित विशेष शाळा/ कर्मशाळांना शासन निर्णय दिनांक २३/४/२०२१ व कार्यशाळेतील १० पदांना शासन निर्णय दिनांक ३०/९/२०२२ अन्वये जानेवारी २०१६ पासून ७ वा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे. तसेच राज्यातील विशेष शाळा/ कर्मशाळेतील शिक्षकांची वेतन निश्चिती व वेतन पडताळणीची कार्यवाही आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांच्या स्तरावर सुरु असल्यामुळे त्यांना ७ व्या वेतन आयोगाचे लाभ मिळालेले नाहीत.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

अ) मुंबई शहर :- मुंबई शहरामध्ये वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता यांचे एक पद मंजूर असून ते पद भरलेले आहे. सहाय्यक सल्लागार हे पद मंजूर नाही.

ब) मुंबई उपनगर :- वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता हे पद मंजूर नाही. सहाय्यक सल्लागार यांचे एक पद मंजूर आहे परंतु सद्य:स्थितीत ते पद रिक्त आहे.

क) पालघर वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता व सहाय्यक सल्लागार यांचे प्रत्येकी एक पद मंजूर असून सद्य:स्थितीत दोन्ही पदे रिक्त आहे.

सदरहू तीन जिल्ह्यामध्ये रिक्त असेलेल्या पदावर जिल्हा परिषद कार्यालयाकडून अन्य कर्मचाऱ्यांना कार्यभार देण्यात आलेला आहे. तसेच मुंबई शहर, उपनगर व पालघरला पूर्ण वेळ अधिकारी देण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त समाज कल्याण, पुणे व आयुक्त दिव्यांग कल्याण, पुणे यांच्याकडून शासनास प्राप्त झालेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग समुद्रातील तेलप्रदूषण रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(२०) * १५५५५ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग समुद्रात ४० ते ४५ वाव पाण्यात बुडालेल्या पार्थ या तेलवाहतूक जहाजातून समुद्रात तेलगळती सुरु झाल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, समुद्रातील तेलगळतीमुळे मच्छीमारांना समुद्रात डांबराच्या गठ्ठयांचा तवंग निदर्शनास आला असून त्यामुळे मच्छीमारी व्यवसायाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन समुद्रातील तेलप्रदूषण रोखण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) मत्स्यव्यवसाय विभागाकडून प्राप्त अहवालानुसार मच्छीमारी व्यवसायाला धोका निर्माण झालेला नाही.
(३) तेल गळती झाल्यास पुर्वतयारी म्हणून महसूल विभागामार्फत दिनांक २१ सप्टेंबर, २०२२ रोजी देवगड तहसिल कार्यालय येथे व दिनांक २३/०९/२०२२ रोजी चिवला बिच, मालवण येथे तटरक्षक दल, रत्नागिरी यांच्या मार्गदर्शनाखाली रंगीत तालमीचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर प्रशिक्षणादरम्यान मासेमार बांधव उपस्थित होते तसेच सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचना दिनांक २३/०९/२०२२ च्या पत्राने सर्व मासेमार बांधव यांना कळविण्यात आले. संभाव्य तेल गळतीच्या अनुषंगाने आवश्यक खबरदारी घेण्यासाठी सर्व मासेमार बांधव/नौका मालक/खलाशी वर्ग यांना मत्स्य सहकारी संस्थामार्फत विभागाकडून सतर्क करण्यात आले.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या शासकीय/निमशासकीय अधिकारी/कर्मचारी यांची पदे रिक्त करुन पदभरती करणेबाबत

**(२१) * १६२०० श्री.आमश्या पाडवी : तारांकित प्रश्न क्रमांक १२८६९ ला दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जमातीच्या ज्या शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांनी जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र दाखल केले नाही अशा सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालयाने सन २०१६, २०१७ मध्ये सेवेतून कमी करण्याची कार्यवाही करण्याबाबत शासनाला आदेशित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ज्या कर्मचाऱ्यांचे जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र दाखल केलेले नाही अशा अधिकारी/कर्मचारी यांच्यावर मा.न्यायालयाच्या आदेशानुसार कोणतीच कार्यवाही न करता अधिसंख्य पदे निर्माण करुन त्यांची कार्यकारी पदावर नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या व जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवा ११ महिन्यांच्या कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात अधिसंख्य पदावर वर्ग करुन सदर रिक्त झालेली पदे कालबध्द कार्यक्रमानुसार अनुसूचित जमातीच्या जात वैधता प्रमाणपत्र धारकाकडून भरण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले असून सदर भरती प्रक्रिया राबविण्याबाबतच्या सूचना दिनांक १५/४/२०२१, ३०/७/२०२१ व २४/१२/२०२१ च्या अ.शा. पत्रान्वये सर्व प्रशासकीय विभागांना देण्यात आलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र दाखल न करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांची कार्यकारी पदावरील नियुक्ती रद्द करुन मा.न्यायालयाच्या आदेशानुसार सदरहू कर्मचाऱ्यांना शासन सेवेतून कमी करुन अनुसूचित जमाती प्रवर्गातील राखीव असलेली रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे** : (१), (२), (३) व (४) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हिल अपील क्र.८९२८/२०१५ (चेअरमन ॲण्ड मॅनेजिंग डायरेक्टर, एफसीआय आणि इतर विरुध्द जगदिश बालाराम बहिरा व इतर व इतर याचिका यामध्ये) दिनांक ६/७/२०१७ रोजी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अथवा इतर मागासवर्ग या जातींना असलेल्या आरक्षणाच्या आधारे शासकीय सेवेत दाखल झालेल्या व त्यानंतर जातीचे दावे अवैध ठरलेल्या व्यक्तींना शासकीय सेवेत संरक्षण देय ठरत नाही. अशा व्यक्तींना शासकीय सेवेत दिलेले संरक्षण घटनेतील तरतूदींशी विसंगत ठरते, असा निर्णय दिला. तसेच मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी रिट याचिका क्रमांक ३१४०/२०१८ मध्ये अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांची पदे डिसेंबर, २०१९ पर्यंत रिक्त करुन रिक्त झालेली अनुसूचित जमातीची पदे अनुसूचित जातीच्या खऱ्या/ मूळ (Genuine) उमेदवारांमधून भरण्याची कार्यवाही डिसेंबर, २०१९ पर्यंत पूर्ण करावी, असा निर्णय दिला आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या व मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांच्या सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना मानवतावादी दृष्टीकोनातून तसेच प्रशासकीय अडचण दूर करण्यासाठी अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे आदेश दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयान्वये दिले. तसेच अधिसंख्य पदावर वर्ग केल्यामुळे रिक्त झालेली अनुसूचित जमातीची पदे कालबध्द कार्यक्रम राबवून तात्काळ भरण्याचे आदेश दिले. तथापि, त्यानंतर कोविड-२०१९ या महामारीमुळे देशात लॉकडाऊन घोषित केल्यामुळे सदर भरती प्रक्रिया पूर्ण क्षमतेने राबविता आली नाही. सदर भरती प्रक्रिया पूर्ण क्षमतेने राबविण्याच्या शासनस्तरावरुन वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे, औरंगाबाद व नागपूर मार्गावरील ट्रॅव्हल्स चालक प्रवाशांची आर्थिक लूट करीत असल्याबाबत

**(२२) * १५२६० श्री.महादेव जानकर, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यामध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) तिकिट दराच्या केवळ ५० टक्के अधिक भाडे आकारण्याची मुभा ट्रॅव्हल्स चालकांना असताना प्रत्यक्षात मात्र ट्रॅव्हल्स चालक प्रवाशांकडून राजरोसपणे ५० टक्क्यांपेक्षा अधिक प्रवासी भाडे आकारुन प्रवाशांची आर्थिक लूट करित असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यासह औरंगाबाद व नागपूर मार्गावर दिवाळी व इतर सणांच्या कालावधीत खाजगी ट्रॅव्हल्स चालक प्रवासी तिकिटाचे दर दुप्पट व तिप्पट वाढवून प्रवाशांकडून अधिक तिकिट दर आकारुन आर्थिक लूट करीत आहेत, तसेच नागपूर, पुणे याठिकाणी यापूर्वी रुपये १६०० प्रवासी दर आकारण्यात येत होते परंतु, सणाच्या कालावधीत प्रवासी दर रुपये ३८०० ते ४००० पर्यंत वाढविण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर, मुंबई, भंडारा, यवतमाळ, अमरावती, नाशिक, इंदोर तसेच मुंबईतून नागपूर, उस्मानाबाद, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, पुणे, औरंगाबाद, अहमदनगर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, चंद्रपूर, गोंदिया आणि अन्य सर्वच ठिकाणी प्रवास करणाऱ्या प्रवाशांकडून खाजगी ट्रॅव्हल्स चालकांकडून तिकिट दरात वाढ करुन प्रवाशांची आर्थिक लूट होत असतानाही परिवहन विभागाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रवाशांकडून वाढीव दर आकरुन लूट करणाऱ्या खाजगी ट्रॅव्हल्सचालकांवर कारवाई करुन खाजगी ट्रॅव्हल्सचे प्रवासी दर नियंत्रणात ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) जादा भाडे आकारणे अशा स्वरुपाच्या काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

(३) व (४) अ) खाजगी वाहतूकदारांनी निर्धारित करण्यात आलेल्या दरापेक्षा अधिक दर आकारल्यास, सदर वाहनांवर कारवाई करणेबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाने राज्यातील सर्व प्रादेशिक /उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना दिनांक १९/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये तसेच मौखिकरित्या वेळोवेळी निर्देश दिलेले आहेत.

ब) सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकामार्फत वाहतूकदारांच्या ठिकठिकाणच्या बुकिंग कार्यालयाना भेटी देऊन तसेच प्रवाशांशी संवाद साधून, शासन निर्णयाप्रमाणे भाडे आकारणी होत असल्याची खात्री करुन घेतली जाते. तसेच खाजगी बसेसची नियमित सखोल तपासणी करुन तपासणी दरम्यान दोषी आढळून आलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायदा व तद्नुषंगीक नियमांतील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येते. राज्यातील क्षेत्रिय कार्यालयांकडून जादा भाडे आकारणाऱ्या एकूण ३०३ दोषी वाहनांकडून दंड वसूल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनाच्या विविध विभागांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२३) * १६०६४ ॲड.अनिल परब, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाच्या विविध विभागांतील वर्ग १ ते वर्ग ४ ची २,७५,००० पदे रिक्त असून मागील १० वर्षांत २,८९,००० कर्मचारी निवृत्त झाल्यामुळे मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत माहे जुलै, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात आश्वासित करुनही रिक्त पदे भरण्यात आली नाहीत तसेच दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी शासनाने ७५,००० पदाची भरती केली जाईल, त्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची पदे १०० टक्के तर जिल्हा निवड समित्यांमार्फत ५० टक्के पदे भरण्यात येतील असे विधानपरिषद सभागृहात आश्वासित करुनही रिक्त पदे भरण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट 'ब' अराजपत्रित आणि गट 'क' व 'ड' वर्गातील सर्व जागा पुन्हा दुय्यम सेवा निवड मंडळाच्या माध्यमातून भरण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय, असल्यास, यापूर्वी दुय्यम सेवा निवड मंडळाच्या माध्यमातून करण्यात आलेल्या निवड प्रक्रियेत गैरव्यवहार व घोटाळे झाल्याचे निदर्शनास येऊनही पुन्हा दुय्यम सेवा निवड मंडळाच्या माध्यमातून निवड प्रक्रिया राबविण्याची कारणे काय आहेत, याबाबतच्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) असल्यास, राज्यातील आरोग्य विभाग, टीईटी अशा संगणकाधारित परीक्षेत झालेल्या गैरप्रकाराच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या ४० संवर्गाच्या चाळणी परीक्षा पारंपारिक पध्दतीने घेण्याची मागणी महाराष्ट्र लोकसेवा आयोग समन्वय समितीने दिनांक २२ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रशासकीय कार्यालयातील कामांचा निपटारा करण्यासाठी तसेच कार्यरत कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी करण्यासाठी रिक्त पदे भरण्याबाबत तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची ४० संवर्गाची चाळणी परीक्षा ऑनलाईन (संगणकाधारित) पध्दतीने न घेता पारंपारिक पध्दतीने घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) माहे डिसेंबर, २०२० अखेरपर्यंतच्या आकडेवारीनुसार राज्य शासकीय सेवेत सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांची संख्या १,२५,७१२ व जिल्हा परिषद सेवेतील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्त पदांची संख्या ३८,९३९ इतकी अशी एकूण १,६४,६५१ इतकी पदे रिक्त होती.

या अनुषंगाने सन २०२२ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनातील लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान मा.मंत्री, राज्य उत्पादन शुल्क यांनी, "रिक्त पदांमधील ७५ हजार पदे एका वर्षामध्ये भरण्याची प्रक्रिया तातडीने सुरु केली जाईल," असे विधानपरिषद सभागृहात आश्वासित केले. सदर आश्वासनाच्या अनुषंगाने, सर्व प्रशासकीय विभागांना दिनांक ९/११/२०२२ च्या पत्रान्वये, विभागांतर्गत रिक्त पदे भरण्याची प्रक्रिया सत्वर सुरु करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

अ) राज्य शासकीय कार्यालयातील सरळसेवेने भरावयाची गट-क मधील लिपिक वर्गीय संवर्गातील पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यास दिनांक २/११/२०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली असून, यापैकी प्रथम टप्प्यात लिपिक-टंकलेखकांची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येणार आहेत. तसेच,

ब) भूतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील (महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड संवर्गातील सरळसेवा पदभरती करताना स्पर्धा परीक्षा टि.सी.एस.-आयओएन (टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस लिमिटेड) व आय.बी.पी.एस. (इंस्टीट्यूट ऑफ बँकिंग पर्सोनेल सिलेक्शन) या कंपन्यांमार्फत ऑनलाईन पध्दतीने (Computer Programme Based test/Examination) घेण्यास दिनांक २१/११/२०२२ च्या शासन निर्णयाद्वारे शासन मान्यता देण्यात आली आहे.

(३) शासनाकडे तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे महाराष्ट्र लोकसेवा आयोग समन्वय समितीचे दिनांक २२ ऑक्टोबर, २०२२ रोजीचे निवेदन आढळून आले नाही.

(४) व (५) महाराष्ट्र लोकसेवा आयोग सांविधानिकदृष्ट्या स्वायत्त संस्था असून, आयोगामार्फत परीक्षा प्रक्रिया राबविण्याबाबत धोरण ठरविले जाते. त्यामध्ये शासनस्तरावर हस्तक्षेप करण्यात येत नाही.

आयोगामार्फत आयोजित संगणक प्रणालीवर आधारित परीक्षा या थेट आयोगाच्या नियंत्रणाखाली व आयोगाच्या कार्यपध्दतीनुसार आयोजित करण्यात येतात. शासनाच्या विविध विभागाच्या मागणीनुसार विशिष्ट शैक्षणिक अर्हता अथवा अनुभवावर आधारित पदभरतीकरीता प्राप्त अर्जांची संख्या विचारात घेऊन संगणक प्रणालीवर आधारित चाळणी परीक्षा घेण्याचा निर्णय आयोगाकडून सन २०२० मध्ये घेण्यात आला आहे.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात कोविड काळात सेवा देणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायमस्वरूपी सामावून घेणेबाबत

**(२४) * १५३७८ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील कोविड काळात रुजू झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत कायमस्वरूपी सामावून घेणेबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे पाठपुरावा केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यात आगामी काळात सार्वजनिक आरोग्य विभागात भरण्यात येणाऱ्या ७००० पदांसाठी कोविड काळात सेवा दिलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांचे गुणांकन करुन त्यांना प्राधान्य देण्यात येणार असल्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पनवेल महानगरपालिका क्षेत्राच्या लोकसंख्येनुसार भविष्यात आणखी आरोग्य केंद्रे व मिनी रुग्णालये उभारावे लागणार असून कोविड काळात महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात डॉक्टर, नर्स, फार्मासिस्ट, लॅब टेक्निशियन अशा विविध पदांवर नेमलेल्या आरोग्य सेवकांना कामावरुन कमी करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात कोविड काळात सेवा देणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सामावून घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) पनवेल महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील कोविड काळात रुजू झालेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सामावून घेणेबाबत निवेदने प्राप्त झाल्याची बाब पनवेल महानगरपालिकेने कळविली आहे.
(२) राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक १२/०९/२०२२ रोजीच्या बैठकीत कोविड-१९ काळात कंत्राटी सेवा बजावलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांची नोंद घेऊन सार्वजनिक आरोग्य मधील भरतीच्या वेळी त्यांचे गुणांकन करण्याची कार्यपध्दती ठरविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
(३) व (४) कोविड-१९ साथीच्या काळात कोविड उपाय योजनाच्या कामाकरीता अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या सेवा ठोक मानधनावर व तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पध्दतीने पनवेल महानगरपालिकेने उपलब्ध करुन घेतल्या होत्या. तथापि, उपरोक्त कामकाज संपल्यानंतर सदरचा सेवा करार संपुष्टात आणण्यात आला असल्याची बाब पनवेल महानगरपालिकेने कळविली आहे.

सदरची वैद्यकीय सेवा आपत्कालीन परिस्थितीमध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात बाह्य यंत्रणेमार्फत उपलब्ध करुन घेतली असल्याने संबंधित कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या सेवेत कायमस्वरुपी सामावून घेणे शक्य नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला (जि.अकोला) शहरात पथदिवे लावून त्यांची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत

**(२५) * १५३२८ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहरातील (जि.अकोला) पथदिवे लावण्याचे कंत्राट मे.ई.ई.एस.एल. कंपनीला देण्यात आले असून काही प्रभागांमध्ये पथदिवे लागले नसतानाही अकोला महानगरपालिकेच्या विद्युत विभागाकडून संपूर्ण पथदिवे लागल्याचा दावा करण्यात येत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संपूर्ण प्रभागांत २२ हजार पथदिवे लावण्यात आल्याचा दावा महानगरपालिकेच्या विद्युत विभागाने केला असून शेकडो खांब पथदिव्याविना असल्याची तक्रार नगरसेवक व नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शहरातील मुख्य रस्त्यावर पथदिवे लागूनही पथदिवे बंद असल्याने अंधार पसरला असल्याने या देखभाल दुरुस्तीकडे विद्युत विभागाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अकोला शहरात पथदिवे लावून त्यांची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

अकोला महानगरपालिका हद्दीमध्ये एल.ई.डी. पथदिवे लावण्याचे कंत्राट मे.ई.ई.एस.एल. कंपनीला देण्यात आले आहे. या कंपनीने एकूण ३०,३४४ नग पथदिवे लावावयाचे असून त्यापैकी कंपनीने आतापर्यंत २९,१५७ नग पथदिवे लावले आहेत. उर्वरित पथदिवे लावायचे काम सुरू आहे. तसेच आवश्यकतेनुसार महावितरणकडून व महानगरपालिकेकडून नवीन विद्युत खांब बसविण्यात येत आहेत.
(३) व (४) हे खरे नाही.

अकोला शहरातील बंद पथदिव्यांच्या तक्रारीकरीता पथदिवे तक्रार निवारण केंद्र सुरू करण्यात आले असून त्याद्वारे नागरीकांच्या प्राप्त तक्रारींचे निरसन करण्यात येते.

मे.ई.ई.एस.एल. सोबतच्या करारानुसार देखभाल व दुरूस्ती करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंधेरी (पूर्व) येथील रेल्वे क्रॉसिंगवरील गोखले पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२६) * १५१६३ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंधेरी (पूर्व) येथील रेल्वे क्रॉसिंगवरील गोखले पुलाच्या कामाकरीता सन २०२० मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने निविदा प्रक्रिया पूर्ण करुन पुलाचे बांधकाम करण्यासाठी कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश दिले असून, सदर पुलाचे काम माहे एप्रिल, २०२२ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असतानाही पुलाचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुलाचे बांधकाम अपूर्णावस्थेत राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, अंधेरी (पूर्व) येथील रेल्वे क्रॉसिंगवरील गोखले पुलाच्या काही भागाच्या डिझाइनचा अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही, आयआयटीच्या मंजूरीनंतर पुलाचे डिझाईन रेल्वे प्राधिकरणाला दाखविण्यात येवून त्यानंतर पुलाचा उर्वरित भाग बांधण्यासाठी नवीन कंत्राटदार नेमायचा की सध्याच्या कंत्राटदारालाच काम द्यायचे याचा निर्णय घेतला जाणार आहे, त्यामुळे गोखले पुलावर सध्या एक मार्गिका सुरु असल्याने या मार्गाने प्रवास करणे गैरसोयीचे होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अंधेरी (पूर्व) येथील रेल्वे क्रॉसिंगवरील गोखले पुलाचे काम जलद गतीने पूर्ण करुन पूल वाहतुकीसाठी पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) कोविड-१९ चा प्रादुर्भाव व वाहतूक विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यास झालेला उशीर या कारणांमुळे सदर पुलाचे काम माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये सुरु करण्यात आले आहे.
(३) अंधेरी येथील गोखले पुलाच्या रेल्वे क्रॉसिंगचा सर्वसाधारण आराखडा व संकल्पचित्रे (डिझाईन) इ. ची आय.आय.टी., मुंबई यांचेमार्फत फेरतपासणी करुन घेण्यात आली आहे.

सदर पुलाच्या उर्वरित भागाच्या बांधकामाकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नवीन कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आली असून, सदर कामाकरीता कार्यादेश देण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.

सदर पूल जीर्णावस्थेत असल्यामुळे सल्लागाराच्या अभिप्रायानुसार वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. सबब दक्षिणेकडील कॅप्टन गोरे पूल, मिलन आर.ओ.बी. व उत्तरेकडील बाळासाहेब ठाकरे उड्डाणपूल येथे वाहतूक वळविण्यात आली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) सद्य:स्थितीत उत्तरेकडील अर्ध्या पुलाच्या महानगरपालिकेच्या हद्दीतील पुलाचे काम प्रगतीपथावर असून, ते माहे जून, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

सदर पुलाच्या रेल्वेकडील भागाचे निष्कासन रेल्वेमार्फत करण्यात येत असून, तद्नंतर त्या भागाच्या पुनर्बांधणीची कार्यवाही महानगरपालिकेमार्फत प्राधान्याने करण्यात येणार आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) माध्यमातून ठाण्यामध्ये पायाभूत सुविधांचे प्रकल्प पूर्ण करण्याबाबत

**(२७) * १५६०५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) माध्यमातून ठाण्यामध्ये पायाभूत सुविधांचे रुपये १७ हजार कोटींचे प्रकल्प घेण्यात आले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पांमुळे ठाणे शहरासह जिल्ह्यातील बहुतांश भागातील वाहतूक कोंडी सुटणार असल्याने सर्व प्रकल्प कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार, त्याचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

मुंबई, ठाणे, पालघर व नवी मुंबई शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्याबरोबरच विकास करण्याच्या दृष्टीने सदर शहरांमध्ये अंदाजे रुपये १७,२१४.७२ कोटी किंमतीच्या विविध १७ कामांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १५३ व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सद्य:स्थितीत सदरहू कामांची तांत्रिक व्यवहार्यता तपासणे, विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करणे, अंदाजपत्रके तयार करणे, इत्यादीसाठी प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागारांच्या नियुक्तीची प्रक्रिया प्राधिकरण स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) तालुक्यातील अल्पसंख्यांक विभागाकडून मंजूर झालेल्या शासकीय तंत्रनिकेतन इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(२८) * १५२६९ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) तालुक्यातील अल्पसंख्यांक विभागाकडून मंजूर झालेल्या शासकीय तंत्रनिकेतन इमारतीचे बांधकाम अपूर्ण असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीचे बांधकाम केव्हा सुरु करण्यात आले होते व इमारतीचे बांधकाम अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय तंत्रनिकेतन इमारतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) सदर इमारतीचे बांधकाम सप्टेंबर, २०१८ मध्ये सुरु करण्यात आले आहे. इमारतीचा काही भाग व परीसरातील नागरीकांसाठी रस्ता यासाठी जागा उपलब्ध नसल्याने बांधकामाचा वेग मंदावला आहे.
(३) सदर प्रकरणी जागा उपलब्ध होण्यासाठी, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच शासकीय अधिकाऱ्यांद्वारे भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नैसर्गिक आपत्तीच्या मदतीसाठी असलेल्या जुन्या निकषात बदल करुन नवीन सुधारित निकष अंमलात आणून आर्थिक मदत देण्याबाबत

**(२९) * १६१०२ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नैसर्गिक आपत्तीच्या काळात ओढवलेल्या संकटात केंद्र शासनाच्या दिनांक ८ एप्रिल, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच राज्याच्या महसूल व वन विभागाने केंद्र शासनाच्या निकषावर आधारित दिनांक १३ मे, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित होणाऱ्या नागरिकांना मदत देण्यात येत असून हा शासन निर्णय सन २०१५ ते २०२० या कालावधीतपर्यंतच मर्यादित होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२० नंतर वाढलेली महागाई, डिझेलच्या किंमती व अन्य दरवाढ दिवसेंदिवस होत असताना सात वर्षांपूर्वीचे (म्हणजे सन २०१५ मध्ये) आपदग्रस्तांना मदत देण्याबाबतचे निकष व दर कालबाह्य ठरले असताना त्याच जुन्या निकष दरावर आधारित मदत केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र व राज्य शासनाचे कालबाह्य झालेले शासन निर्णय विचारात घेता, सदरचे निर्णय अद्ययावत (अपडेटेड) करुन त्यानुसार आर्थिक मदत द्यावी, अशी राज्यातील नागरिकांनी तसेच लोकप्रतिनिधींनी मागणी केली असल्याचे दिनांक २० जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सन २०२० नंतर राज्यात आलेल्या नैसर्गिक आपत्तीनुसार सात वर्षांपूर्वीचे जुने निकष व दर सुधारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

मागील काही वर्षांमध्ये नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात बाधित झालेल्या क्षेत्राकरीता व व्यक्तींना मदत देण्यासाठी त्या-त्या वेळी मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार विविध बाबींकरीता वाढीव दराने मदत देण्यात आली आहे.

(३) खरे आहे.

(४) केंद्र शासनाकडे नैसर्गिक आपत्ती निकषाच्या धर्तीवर नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणाऱ्या आपदग्रस्त व्यक्तींना द्यावयाच्या मदतीचे सुधारित निकष व दर केंद्र शासनाकडून प्राप्त झाले असून मंत्रिमंडळाच्या मान्यतेनंतर नवीन सुधारित निकष व दर प्रसिध्द करण्यात येतील.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(३०) * १५९९७ श्री.अंबादास दानवे, श्री.सचिन अहिर, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे साठवलेला कांदा व कांदा पिकाचे नुकसान झाले असून कांद्यावरील निर्यात शुल्काचा दर जास्त असल्यामुळे तसेच कांदा पिकाला योग्य दर मिळत नसल्याने कांदा उत्पादक शेतकरी आर्थिक अडचणीत आल्याचे माहे एप्रिल, २०२२ ते ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कांदा साठवणुकीकरीता शासनामार्फत कांदा चाळीला अनुदान देण्यात येते, तथापि, कांदा पिकाला दर वाढवून देण्यात येत नसल्यामुळे शेतकऱ्यांना कांदा उत्पादनास येणाऱ्या खर्चापेक्षा कमी भावात कांद्याची विक्री करावी लागत आहे, तसेच कांदा पिकाबाबत शासन धोरणांची अनिश्चितता असल्यामुळे साठवणूक प्रक्रियेमध्ये गुंतवणूक करण्यास व्यापारी व निर्यातदार तयार होत नसल्याने कांदा पिकाच्या दराबाबत धोरण तयार करावे, अशी मागणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशवंत पिकांना संरक्षण देण्यासाठी केंद्र शासनाने बाजारहस्त योजना सुरु केली असून या योजनेत सफरचंद, लसून, द्राक्ष, मोसंबी, मशरुम इ. पिकांचा समावेश केला आहे, तथापि, कांदा पिकांचा समावेश सदर योजनेत केलेला नसल्यामुळे कांदा पिकाचा बाजार हस्तक्षेप योजनेत समावेश करावा, अशी मागणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तसेच माहे मार्च व एप्रिल दरम्यान अत्यल्प विक्री झालेल्या कांदा पिकाला प्रतिक्विंटल रुपये १००० अनुदान द्यावे, मनरेगा योजनेत कांदा पीक समाविष्ट करुन कांदा लागवड ते काढणीपर्यंत मजुरीचा खर्च देण्यात यावा व नाफेडमार्फत कांदा विक्री चालू करावी, अशी मागणी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कांदा पीकावरील निर्यात शुल्काचे दर कमी करण्याबाबत, कांदा पीकाचे दर उत्पादन खर्चानुसार निश्चित करण्याबाबत तसेच कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यात एप्रिल, २०२२ ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीमध्ये काही बाजार समित्यांमध्ये कांद्याचे दर कमी झालेले आहेत. सदर कालावधीमध्ये कांद्याचा प्रती क्विंटल दर १०० ते ५०० रुपये होता व जास्तीत जास्त १६०० रूपये होता.
(२) मा.श्री.छगन भुजबळ, विधानसभा सदस्य यांनी कांदा बाजारभावातील घसरण थांबविण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत दिनांक २२/०७/२०२२ रोजी शासनास विनंती केली आहे.
(३) बाजार हस्तक्षेप योजना फळवर्गीय पिकांसाठी राज्यशासनाच्या विनंतीवरून राबविण्यात येते. यापूर्वी राज्यशासनाने १९८९-९० व १९९९-२००० मध्ये कांद्यासाठी बाजार हस्तक्षेप योजना राबविली होती. तथापि, सदर योजनेंतर्गत राज्य शासनाला मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाल्यामुळे २००८ पासून कांदा उत्पादक शेतकऱ्यांना त्या-त्या वेळेच्या परिस्थितीनुसार अनुदान देण्यात येते. सन २०१६-१७ मध्ये रुपये ४१.३३ कोटी आणि सन २०१८-१९ मध्ये रुपये ५०४ कोटी इतके अनुदान वितरित केले आहे.
(४) याबाबत दिनांक १३/०४/२०२२ च्या ॲग्रोवन, सकाळ या वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. मनरेगा योजना प्रामुख्याने रोजगार वाढीसाठी व निर्मितीसाठी राबविण्यात येते. कांदा पीक हे बहुवार्षिक नाही. ते खरीप, लेट खरीप आणि रब्बी हंगामात घेतले जात असल्याने मनरेगा योजनेत कांदा पीकाचा समावेश नाही.
(५) कांद्याच्या निर्यातीवरील किमान निर्यात मुल्य (Minimum Export Price) शुन्य आहे. तसेच निर्यातीसाठी असलेल्या RoDTEP - Remission Of Duties and Taxes on Export Products या योजनेंतर्गत कांदा निर्यातीसाठी मिळणारे अनुदान २ टक्क्यांवरून १० टक्के करण्याबाबत केंद्र शासनास मा.मुख्यमंत्री महोदय यांचे स्तरावरून विनंती करण्यात आलेली आहे.

तसेच केंद्रशासनाने फळे व भाजीपाला निर्यातीसाठीच्या वाहतूकीवरील दिलेली GST ची सूट दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ च्या पुढेही चालू ठेवण्यासाठी मा.उपमुख्यमंत्री महोदय यांच्या स्तरावरून दिनांक १०/१०/२०२२ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास विनंती करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेंतर्गत (बार्टी) संचालित संस्थांमध्ये कोट्यवधींचा गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३१) * १५५५२ श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेश कराड, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) अंतर्गत राज्यात सुमारे ३० संस्था संचालित करण्यात येत असून या संस्थांना बार्टी कडून दरवर्षी कोट्यवधीचे अनुदान दिले जाते,

सदर संस्थांपैकी काही संस्था चालकांनी अपात्र तज्ज्ञ व्यक्ती, व्याख्याते प्रशिक्षकांची नियुक्ती करुन कोट्यवधीचा गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक ४ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेतर्फे (बार्टी) दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी शासनाने घोषित केलेल्या योजनेच्या अंमलबजावणीबाबत

**(३२) * १५८६८ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहावीच्या (एस.एस.सी.) परीक्षेत ९० टक्के अथवा त्यावरील गुणांसह उत्तीर्ण होणाऱ्या अनुसूचित जातीतील गरीब विद्यार्थ्यांना जेईई, नीट, सीईटी सारख्या परीक्षेच्या तयारीसाठी वर्ग ११ वी व १२ या दोन वर्षात प्रति विद्यार्थी प्रत्येकी एक लक्ष असे एकूण रुपये २ लक्ष मदत डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) मार्फत देण्याची योजना शासनाने सन २०२१ रोजीपासून राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनातर्फे सदर योजना राबविण्यासाठी निधी प्राप्त न झाल्याने सुमारे साडेचार हजारावर पात्र विद्यार्थी या योजनेपासून वंचित राहिल्याचे दिनांक १ जुलै, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेच्या अमंलबजावणीबाबत आढावा घेऊन अंतिम धोरण तयार करण्याचे काम सुरू आहे, विद्यार्थ्यांना नामांकित संस्थांच्या माध्यमातून मार्गदर्शन करून सदर योजनेबाबत सकारात्मक निर्णय होईल, असे बार्टी संस्थेचे महासंचालकांनी सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) दहावीच्या (एस.एस.सी.) परिक्षेत ९० टक्के अथवा त्यावरील गुणांसह उत्तीर्ण होणाऱ्या अनुसूचित जातीतील गरीब विद्यार्थ्यांना जेईई, नीट, सीईटी सारख्या परिक्षेच्या तयारीसाठी वर्ग ११ वी व १२ या दोन वर्षात प्रति विद्यार्थी प्रत्येकी एक लक्ष असे एकूण रुपये २ लक्ष देण्याबाबतचा सुधारित प्रस्ताव डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) कार्यालयाने शासनास सादर केलेला आहे. सदर प्रस्ताव शासनस्तरावर विचाराधीन आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाजार विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३३) * १६४५२ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईकरांना चांगले, सकस, सुरक्षित मांस, मासळी मिळण्याची जबाबदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाजार विभागातील विशेष दक्षता पथकावर असताना सदर विभागाकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे मुंबईत मोठ्या स्वरुपात अवैध मांस, मासळीची विक्री सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजार विभागातील विशेष दक्षता पथकात २३६ अधिकारी/कर्मचारी पैकी केवळ २५ अधिकारी/कर्मचारी कार्यरत असून २११ पदे रिक्त असल्यामुळे विशेष दक्षता पथकास अवैध व्यवसायावर नियंत्रण ठेवणे अवघड झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या बाजार विभागाने सन २०११ पासून नवीन परवाना न दिल्याने अवैध दुकानांची संख्या वाढली असून महानगरपालिकेचा लाखो रुपयांचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने बाजार विभागातील अधिकारी/कर्मचारी यांची संख्या वाढवून तसेच पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण करुन रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाजार विभागाच्या विशेष दक्षता विभागातील कर्मचाऱ्यांमार्फत मुंबई शहर, पश्चिम उपनगरे व पूर्व उपनगरात मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ मधील कलम ४१० (१), ४१२ अन्वये जनावरांच्या अनधिकृत आयातीवर, कत्तलीवर व अनधिकृत मांस, कोंबडी व मासळी विक्रेत्यांवर तक्रारींच्या अनुषंगाने कारवाई करण्यात येते व तक्रारींचे निवारण करण्यात येते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) बाजार विभागाच्या आस्थापनेवर मुंबई शहर, पश्चिम उपनगरे व पूर्व उपनगरांकरीता २१० निरीक्षक, २२ मुख्य निरीक्षक व ४ सहाय्यक अधीक्षक अशी एकूण २३६ पदे असून, त्यापैकी २१० पदे रिक्त आहेत.

सद्य:स्थितीत ४ सहायक अधीक्षक यांचे अधिपत्याखाली दक्षता पथकाचा कार्यभार देण्यात आला असून, मंडई निरीक्षकांची पदे सहाय्यक आयुक्त (बाजार) विभागाच्या दैनंदिन कामकाजाकरीता नियुक्त आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर यांचेविरुध्द मा.उच्च न्यायालयात दाखल केलेली जनहित याचिका क्र. ४३/२०१० व रिट याचिका क्र. २७४६/२०१४ मध्ये मा.न्यायालयाने एअरक्राफ्ट रुल १९३७ मधील रुल ९१ चे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. सदर याचिका न्यायप्रविष्ट आहेत.

तसेच मांस विक्रीचे अनुज्ञापत्र देण्यास ना-हरकत मिळण्याकरीता डायरेक्टर जनरल ऑफ सिव्हील एव्हिएशन यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. मुंबई विमानतळाच्या १० कि.मी. परिघाबाहेर असलेल्या मांस विक्री दुकानांस अटी व शर्तीसापेक्ष अनुज्ञापत्र देण्यात येत आहे.

माहे सप्टेंबर, २०२२ ते माहे नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत अनधिकृत मांस/कोंबडी/मासळी विक्रेत्यांवर प्रभावी कारवाई करण्यात आली असून, सदर कारवाईतून रुपये ९.६६ लाख इतका महसूल महानगरपालिकेच्या तिजोरीत जमा करण्यात आला आहे. तसेच, मुंबई विमानतळाच्या १० कि.मी. परिघाच्या बाहेर असलेल्या मांस विक्री दुकानांना देण्यात येत असलेल्या अनुज्ञापत्राद्वारे महसूल प्राप्त होत आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) बाजार विभागातील २१० रिक्त पदांपैकी ५०% पदे भरण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. तसेच निरीक्षकांच्या पदोन्नतीची कार्यवाही प्राधान्याने सुरु आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये अद्ययावत सोयी सुविधा व आवश्यक यंत्र सामुग्री उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३४) * १५४५५ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अंतर्गत असलेल्या के.ई.एम., सायन, नायर, राजावाडी, शताब्दी, कस्तुरबा, सिध्दार्थ, बाळासाहेब ठाकरे इ. रुग्णालयात विविध सुविधांचा अभाव असून सदरहू रुग्णालयात दैनंदिन वापरात असणारी औषधे उपलब्ध नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परळ येथील महानगरपालिकेच्या के.ई.एम. रुग्णालयात सिटीस्कॅन मशीन महिनाभरापासून बंद असून, त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या नायर रुग्णालयातील सर्व सुविधांनी सुसज्ज असलेले हायडिपेंडन्सी (एच.डी.यु. विभाग) सहा महिन्यांपासून बंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अद्ययावत यंत्र सामुग्रीची कमतरता असल्यामुळे प्रत्येक रुग्णालयात ७ ते ८ हजार रुग्णांसाठी केवळ २ मशीन उपलब्ध असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निधीची तरतूद करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सर्वच रुग्णालयात अद्ययावत सोयी सुविधा व आवश्यक यंत्र सामुग्री उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रमुख रुग्णालये तसेच उपनगरीय रुग्णालयांमध्ये दाखल होणाऱ्या सर्व रुग्णांना औषधे उपलब्ध करुन देण्याकरीता महानगरपालिकेच्या मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत एकूण १२ औषध अनुसूची निर्गमित करण्यात येतात. त्यापैकी १० औषध अनुसूची निर्गमित करण्यात आल्या असून औषध अनुसूची क्रमांक २ व ३ अशा २ अनुसूची निर्गमित करण्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

जम्बो कोविड सेंटर बंद झाल्यानंतर त्यांचेकरीता राखीव परिमाणामध्ये औषध अनुसूची क्रमांक २ व ३ च्या बाबी समाविष्ट होत्या. त्यामुळे औषधांचा तुटवडा उद्भवू नये यासाठी त्यांची दरपत्रके निर्गमित करुन रुग्णालयांना औषधांचा पुरवठा करण्यात आला आहे. तसेच रुग्णालयीन स्तरावर स्थानिक पातळीवर तसेच ई–दरपत्रिकेद्वारे औषधे खरेदी करुन रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के. ई. एम. रुग्णालयातील सी.टी स्कॅन मशीन काही तांत्रिक बिघाडामुळे बंद होती. त्यावेळी रुग्णांना सी.टी.स्कॅन करीता महानगरपालिकेच्या इतर रुग्णालयात पाठविण्यात येत होते. सदर मशीन दुरुस्त करण्यात आली असून सद्य:स्थितीत कार्यरत आहे.

कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामध्ये नायर रुग्णालयात १५ रुग्णशैय्येचा एचडीयू विभाग सुरु करण्यात आला होता. या विभागात मुत्रपिंडोपचार विभागाकरीता ३, रुग्णशैय्या मज्जातंतू (न्युरॉलॉजी) विभागाकरीता ४ आणि रुग्णशैय्या जठरांत्र (गॅस्टोइंटेरोलॉजी) विभागाकरीता २ रुग्णशैय्या राखीव असून, उर्वरित रुग्णशैय्या रिक्त आहेत. या विभागात रुग्णांवर उपचार केले जात असून तो बंद नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये आवश्यक अद्ययावत यंत्रे व संयंत्रे उपलब्ध असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयांमध्ये अद्ययावत सोयी सुविधा व आवश्यक यंत्रे सामुग्री उपलब्ध करुन देण्यासाठी आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता रुपये २८५ कोटी निधीची तरतूद करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. व नायर रुग्णालयात प्रत्येकी एक सी.टी. स्कॅन व एक एम.आर.आय. मशीन खरेदी करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत निविदा मागविण्याचे काम सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळातील निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवृत्तीनंतरची देणी अदा करण्याबाबत

**(३५) * १६०५५ डॉ.प्रज्ञा सातव, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.राम शिंदे, श्रीमती उमा खापरे, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिनांक १ जुलै, २०१९ पासून राज्य परिवहन महामंडळातील एकूण ८ हजार ५०० निवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवानिवृत्तीच्या लाभापोटी निवृत्तीनंतरचे (रजेचे व वेतनवाढ फरकाचे पैसे) रुपये २१५ कोटी इतकी देणी थकीत असल्याचे माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर थकीत रक्कम त्वरीत द्यावी असे आदेश राज्य मानवी हक्क आयोग यांनी राज्य परिवहन महामंडळ प्रशासनाला दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निधीची तरतूद करुन राज्य परिवहन महामंडळातील निवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवृत्तीनंतरची देणी अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) नाही.
(३) व (४) राज्य परिवहन महामंडळाच्या निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवृत्ती नंतरची देणी अदा करण्यात येत आहेत.

-----------------

## मुंबईतील इमारतींमधील आगींचे प्रमाण रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(३६) * १५५०८ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १४१६१ ला दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत सन २०१९ ते २०२२ या चार वर्षांच्या कालावधीत १७,५२७ आगीच्या घटनांची नोंद झाल्याची माहिती मुंबई अग्निशमन दलाने दिनांक २६ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यापैकी ७० टक्के आगी या शॉर्टसर्किटमुळे लागल्या असल्याने मुंबईतील इमारतींमधील अग्निशमन यंत्रणा आणि अग्निसुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील इमारतींमधील आगींचे प्रमाण रोखण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाच्य अभिलेखानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात माहे जानेवारी, २०१९ ते माहे ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत एकूण १७,६१६ आगीच्या घटनांची नोंद झाली आहे.

त्यापैकी जवळपास ७० टक्के म्हणजेच १२,४३८ इतक्या दुर्घटना "सदोष विद्युत प्रणालीमुळे" घडल्याचे निदर्शनास आले आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) मुंबईतील इमारतींमधील आगींचे प्रमाण रोखण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येते :-

- १५ मी. उंचीपेक्षा जास्त उंच बहुमजली इमारतींमधील विद्युत प्रणालीचे नियतकालीक लेखा परिक्षण करण्याकरीता मुख्य विद्युत निरीक्षक यांना दिनांक १८/०२/२०२२ रोजी पत्र पाठविण्यात आले आहे.
- ऊर्जा विभागाच्या दिनांक २७/०८/२०२१ रोजीच्या शासन परिपत्रकानुसार मुंबईतील उत्तुंग निवासी व अनिवासी इमारतींमध्ये आय.ओ.टी. वर आधारीत मायक्रो कन्ट्रोलर डिवाईस बसविण्यासंदर्भात सूचना जारी करण्यात आली आहे.

- मुंबईतील जनतेमध्ये अग्निसुरक्षेबाबत जनजागृती, अग्निशमन व विमोचनाचे प्राथमिक ज्ञान याबाबतचे प्रशिक्षण अवगत असल्यास अशा ठिकाणी आगीसारख्या दुर्घटना उद्भवल्यास त्यावर प्राथमिक स्थितीत योग्य ती उपाययोजना करण्यासाठी नागरिकांमधून अग्निशामक स्वयंसेवक बनविण्याचा कार्यक्रम घेऊन पहिल्या टप्प्यामध्ये अंदाजे ५,५०० नागरिकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.
- दिनांक २४/०७/२०२१ पासून प्रोजेक्ट मुंबई या स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने अग्निरक्षक हा प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत असून आजमितीस अंदाजे १६०० अग्निरक्षक प्रशिक्षित झाले आहेत.
- सर्वसामान्य जनतेस अग्निशमन व अग्निप्रतिबंध विषयक बाबींची माहिती असल्यास दुर्घटना सहज टाळू शकते याकरीता सर्वसामान्य मुंबईकरांसाठी व्याख्याने, मॉक फायर व ईव्हॅक्युएशन ड्रील्स, प्रशिक्षण इत्यादी उपक्रम दैनंदिन कामाबरोबर राबविले जातात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर पूर्व विभागातील स्मार्ट सिटी प्रकल्पातील सोसायट्यांमध्ये मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३७) * १५४५१ श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर पूर्व विभागात स्मार्ट सिटी प्रकल्पामधील धरम नगर, के.के. हाऊसिंग सोसायटी, जगदंबा सोसायटी, कीर्तीधर लेआऊट, आर.बी.हाऊसिंग सोसायटी या परिसरात रस्ते, पाणी, गटार इत्यादी मूलभूत सुविधा नसल्यामुळे सदरहू परिसर घाणीच्या विळख्यात असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भागात पाणी पुरवठ्याची कोणतीही सुविधा नसल्याने टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत असून परिसरात स्वच्छतेकरीता गटाराची सुविधा नसल्यामुळे परिसरातील सांडपाणी रिकाम्या जागेवर साठून सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले असून नागरिकांना आरोग्याच्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नागपूर पूर्व विभागात मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) अमृत योजनेंतर्गत मौजे पुनापूर, भरतवाडा, पारडी या भागात ४,७०० घरगुती नळजोडण्या देण्यात आल्या आहेत. तसेच स्मार्ट सिटी योजनेंतर्गत नागपूर स्मार्ट ॲण्ड सस्टेनेबल सिटी कॉर्पोरेशन यांच्यामार्फत ४ जलकुंभांचे काम व सदर भागातील मुख्य रस्त्यालगत मलनि:स्सारण, पाणीपुरवठा इत्यादी कामे विकास कामामध्ये करण्यात येत आहे. नागपूर सुधार प्रन्यासद्वारे सदर परिसरातील अनधिकृत अभिन्यासाचे नियमितीकरण झाल्यानंतर अंतर्गत रस्ते, गटारे व इतर मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध होणार आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर सुधार प्रन्यास कडून गुंठेवारी अधिनियमांतर्गत करण्यात आलेल्या नियमितीकरणामध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३८) * १५८८९ श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर सुधार प्रन्यास (एनआयटी) च्या माध्यमातून गुंठेवारी कायद्यानुसार सुरू असणाऱ्या नियमितीकरणात आर्थिक गैरव्यवहार झाला असून अनधिकृतपणे मागील दिनांकाचे स्टॅम्प पेपर घेऊन जमीन मालक व भूखंड धारक यांचे खोटे करार दाखवून भूखंड वाटप करण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर सुधार प्रन्यासमधील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मालमत्तेचे लेखापरीक्षण करुन गुंठेवारी कायद्यान्वये अंमलबजावणी करत भूखंड वाटप करण्यात येत असल्याबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी निवदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे विचारणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही, महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम, २००१ मधील तरतूदीनुसार फक्त खाजगी मालकीच्या भूखंडधारकाचे गुंठेवारी अर्जासोबत मालकी किंवा कायदेशीर ताबा याबाबतचा पुरावा सादर केल्यानंतर नियमितीकरणाची प्रक्रिया नागपूर सुधार प्रन्यास मार्फत करण्यात येते. प्रन्यास मार्फत गुंठेवारी अधिनियमाअंतर्गत कोणतेही भूखंड वाटपाची कार्यवाही करण्यात येत नाही. नागपूर सुधार प्रन्यासकडून गुंठेवारी अधिनियमाअंतर्गत करण्यात आलेल्या नियमितीकरणामध्ये कोणताही गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वांद्रे-वरळी सी-लिंकवरील अपघात रोखण्याकरीता उपाययोजना करण्याबाबत

**(३९) * १५०९२ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरळी येथील वांद्रे-वरळी सी लिंकवर रस्ते अपघात तसेच पुलावर दररोज होणाऱ्या आत्महत्या, खुनाच्या घटनांमध्ये वाढ होत असून दिनांक ५ ऑक्टोबर, २०२२ रोजी वांद्रे-वरळी सी लिंकवर झालेल्या अपघातात पाच जणांना प्राण गमवावे लागले तर दहा जण जखमी झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वांद्रे-वरळी सी लिंकवरील होणारे अपघात रोखण्याबाबत उपाययोजना करुन सदर मार्गावरील प्रवास सुरक्षित होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

तथापि, सदर वांद्रे-वरळी सी लिंकवर दररोज होणाऱ्या आत्महत्या, खुनाच्या घटना यामुळे अपघाताच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याची बाब खरी नाही.

(२) वांद्रे वरळी सी लिंकवर भीषण होणारे अपघात टाळण्याच्या अनुषंगाने उपाययोजना सुचविण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत शासन निर्णय क्रमांक खाक्षेस-२०२२/प्र.क्र.३६२/रस्ते-८, दिनांक ०७/१०/२०२२ अन्वये समिती गठीत करण्यात आली आहे. तसेच महामंडळ स्तरावर वेगमर्यादा उल्लंघन करणाऱ्या वाहनांना ओळखण्याकरीता १० स्पीड कॅमेरा, वेग मर्यादेविषयी संदेश देणे, तसेच २ ॲम्ब्युलन्स आणि १ टोईंग व्हॅन २४ तास उपलब्ध आहे. तसेच सुरक्षेच्या दृष्टीने देखरेखीकरीता एकूण ८४ कॅमेरे कार्यान्वित आहेत. सदर मार्गावर सुरक्षेच्या दृष्टीने १० सुरक्षा रक्षक प्रति शिफ्ट असे एकूण ३० सुरक्षा रक्षक कार्यरत असतात. याव्यतिरीक्त नशेत वाहन चालवणाऱ्या चालकांची तपासणी करणे वाहन चालकांना संदेश देणे, कृत्रीम बुध्दीमत्ता असलेले कॅमेरे बसविणे. इ. उपाययोजना करण्यात येत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माजलगांव (जि.बीड) नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्या गैरकारभाराची चौकशी करुन कारवाई करण्याबाबत

**(४०) * १५४४१ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माजलगांव (जि.बीड) नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी पालिकेत अनेक अनधिकृत कामे केली असून, स्वत:च्या भावाच्या नावाने जे.सी.बी/ट्रॅक्टर लावून पालिकेत कामे करीत असताना ९ वर्षांच्या मुलीचा जेसीबीने मृत्यू झाला असून याबाबत मुख्याधिकारी व त्यांच्या भावावर माजलगांव शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झालेला असल्याने सदर मुख्याधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यासाठी सदरील पोलीस निरीक्षकांनी प्रधान सचिव, नगररचना विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दिनांक ४ मे, २०२२ रोजी अहवाल पाठविलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्याधिकारी, माजलगांव नगरपरिषद हे लोकप्रतिनिधींची बेकायदेशीर कामे करीत असल्याने त्यांची बदली इतरत्र करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, माजलगांव यांनी दिनांक १८ मे, २०२२ रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना सविस्तर अहवाल दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगराध्यक्ष, माजलगांव नगरपरिषद यांनीही दिनांक १५ जुलै, २०२२ रोजी मा.मुख्यमंत्री यांचेकडे पत्र पाठवून नगराध्यक्ष पदाच्या काळात अनेक ठरावांची अंमलबजावणी न करणे, निविदा प्रक्रियेत मनमानी करुन निविदा प्रक्रिया राबविणे, भ्रष्टाचार करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पाठीशी घालणे यांसह अनेक तक्रारी पुराव्यासह जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकाऱ्यांकडे करुनही मुख्याधिकारी, माजलगांव नगरपरिषद यांचेवर कारवाई करण्यात आली नसल्याची तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच अनेक प्रकरणांत दोषी असलेल्या मुख्याधिकारी, माजलगांव नगरपरिषद यांना कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांकडील नगरपरिषद प्रशासक पदाचा पदभार नगरविकास प्रशासनाकडून दिनांक २० जून, २०२२ रोजी देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी मुख्याधिकाऱ्यांचा प्रशासक पदाचा पदभार काढून सेवेतून निलंबित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) होय.
(५) शासनाच्या दिनांक २३ सप्टेंबर,२०२२ रोजीच्या आदेशानुसार श्री.विशाल भोसले, मुख्याधिकारी, नगरपरिषद माजलगांव यांची मुख्याधिकारी, गेवराई नगरपरिषद येथे बदलीने पदस्थापना करण्यात आली आहे.

याशिवाय, श्री.विशाल भोसले, तत्कालीन मुख्याधिकारी, माजलगांव नगरपरिषद यांच्या उक्त नगरपरिषदेतील संपूर्ण कार्यकाळात त्यांनी कर्तव्य बजावताना केलेल्या कारभाराबाबत जिल्हाधिकारी, बीड यांनी त्यांच्या दिनांक १०/११/२०२२ रोजीच्या आदेशान्वये उपविभागीय अधिकारी, माजलगांव यांच्या अध्यक्षतेखाली त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमली असून, सदर समितीचा अहवाल प्राप्त होताच पुढील कारवाई करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी महानगरपालिकेतील पाणीपुरवठा योजनेच्या कामात अनियमितता झाल्याबाबत

**(४१) * १५९४६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १३७५७ ला दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी महानगरपालिकेतील पाणीपुरवठा योजनेतील कामात कोट्यवधी रुपयांची अनियमितता झाल्याप्रकरणी ७ अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द दोषारोप पत्र बजावण्यात आले असून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोषी अधिकाऱ्यांची विभागीय चौकशीची कारवाई विहित मुदतीत न करता नियमाचा भंग करणाऱ्या संबंधित चौकशी अधिकाऱ्यांच्या कार्यपध्दतीची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे सन २०२२ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनामार्फत संबंधित अपचाऱ्यांना बजावलेल्या दोषारोपांच्या अनुषंगाने संबंधित अपचारी यांची बचावाची निवेदने तथा खुलासे प्राप्त झाले असून उक्त खुलासे व अतिरिक्त कागदपत्रांच्या आधारे संबंधित अपचारी यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ च्या तरतूदीनुसार विभागीय चौकशी करण्याकरीता चौकशी अधिकारी नियुक्त करण्याची अंतिम टप्प्यातील कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विहित मुदतीत कारवाई न करणाऱ्या चौकशी अधिकाऱ्यांवर तसेच पाणीपुरवठा योजनेतील कामांमध्ये अनियमितता करणाऱ्या ७ दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशीच्या अनुषंगाने दोषारोपाची ज्ञापने दिनांक ११ जुलै, २०१९ रोजी बजावण्यात आली आहेत.

(२) होय.

याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दिनांक ३० जून, २०२२ रोजीचे पत्र मा.मुख्य सचिव, यांचे कार्यालयास दिनांक ०४ जुलै,२०२२ रोजी प्राप्त झाले असल्याचे माहिती आहे.

(३) व (४) होय.

उक्त पत्र तथा निवेदनाच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्याबाबत आयुक्त, परभणी महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.

तसेच, संबंधित अपचाऱ्यांविरुध्द बजावलेल्या दोषारोपांची चौकशी करण्याकरीता, प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांची चौकशी अधिकारी म्हणून तसेच, सादरकर्ता अधिकारी म्हणून सहायक प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांची नियुक्ती दिनांक ०६/१२/२०२२ च्या शासन आदेशान्वये करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण देण्याबाबत

**(४२) * १६०१३ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक १२८१२ ला दिनांक ५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाकडून राज्यातील दलित, आदिवासी, भटके-विमुक्त, अल्पसंख्यांक यांना संविधानाने दिलेल्या आरक्षणाचा हक्क मिळत नसून खाजगीकरणाच्या माध्यमातून पदोन्नतीतील आरक्षण बंद करुन शासकीय नोकरीतील आरक्षण संपविण्यात येत असल्यामुळे राज्यातील आरक्षण हक्क कृती समितीच्या नेतृत्वात सातत्याने आंदोलने करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदोन्नतीतील आरक्षण रद्द करणाऱ्या मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक ४ ऑगस्ट, २०१७ च्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल करण्यात आलेली असून सदर याचिकेची दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ पासून सुरु होणारी अंतिम सुनावणी पूर्ण झाली आहे काय, याबाबतची सविस्तर माहिती काय आहे,

(३) असल्यास, सदरहू सुनावणीकरीता शासनाकडून वकिल देण्यात आले आहेत काय, सदर सुनावणीत अद्यापपर्यंत कोणते निर्णय झाले आहेत, सदरहू सुनावण्या त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही/पाठपुरावा करण्यात आला आहे, तसेच सुनावणी करीता नेमलेल्या वकिलांवर अद्यापपर्यंत शासनाकडून किती खर्च करण्यात आला आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण कायम ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दिनांक ४/०८/२०१७ रोजी आरक्षण अधिनियम-२००१ च्या वैधतेचा प्रश्न खुला ठेवला व पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरवून दिनांक २५/०५/२००४ चा शासन निर्णय रद्द

केला. मा.उच्च न्यायालयाच्या सदर निर्णयाविरुध्द राज्य शासनाच्या वतीने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल करण्यात आली आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८/०१/२०२२ रोजीच्या निकालात तसेच दिनांक २४/०२/२०२२ च्या सुनावणीच्या वेळी पदोन्नतीमधील मागासवर्गीयांच्या प्रतिनिधित्वाची संवर्ग निहाय (cadre wise data) माहिती संकलित करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले. त्यानुसार सर्व प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रिय कार्यालये यांच्याकडून पदोन्नतीमधील मागासवर्गीयांच्या प्रतिनिधित्वाची संवर्ग निहाय माहिती संकलित केली असून सदर माहितीच्या आधारे शासन मान्यतेने मा.सर्वोच्च न्यायालयात दिनांक २०/०९/२०२२ रोजी शपथपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

(३) सदर याचिकेमध्ये शासनाची बाजू मांडण्यासाठी ॲड.परमजीतसिंह पटवालिया, ॲड.कपिल सिब्बल, ॲड.अभिषेक मनू सिंघवी व ॲड.राकेश राठोड यांची विशेष समुपदेशी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर वकीलांनी अद्यापपर्यंत या विभागास देयके सादर केलेली नाहीत.

सदर प्रकरण तात्काळ सुनावणीस घेण्यासाठी मा.सर्वोच्च न्यायालयास विनंती करण्याबाबत दिनांक ३/११/२०२२ च्या पत्रान्वये मा.सर्वोच्च न्यायालयातील सरकारी वकीलांना विनंती करण्यात आली आहे.

(४) पदोन्नती मधील आरक्षण प्रकरणी शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात वेळोवेळी दाखल केलेल्या शपथपत्रांद्वारे मागासवर्गीयांचे पदोन्नतीमधील आरक्षण कायम ठेवण्याची विनंती मा.सर्वोच्च न्यायालयास केली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशानंतर मागासवर्गीयांच्या पदोन्नतीमधील आरक्षणासंदर्भात योग्य ते आदेश निर्गमित करण्यात येतील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई विमानतळाच्या सपाटीकरणाच्या कामासाठी होणाऱ्या बोअर ब्लास्टिंगमुळे वहाळ गावातील घरांना तडे जावून नुकसान झाल्याबाबत

**(४३) * १६४८९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सपाटीकरणाच्या कामासाठी दररोज होणाऱ्या बोअर ब्लास्टिंगमुळे भूकंपासारखे हादरे बसून वहाळ गावातील १०० घरांना तडे जावून नुकसान झाले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विमानतळाचे काम करणाऱ्या ठेकेदारी कंपनीला पेट्रोलियम तथा विस्फोटक सुरक्षा विभागाने कंट्रोल ब्लास्ट करण्याचे निर्देश दिले असतानाही नियमांचे उल्लंघन करुन क्षमतेपेक्षा अधिक स्फोटकांच्या प्रमाणाचा वापर करुन बोअर ब्लास्टिंग करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नियमांचे उल्लंघन करुन क्षमतेपेक्षा अधिक स्फोटकांच्या प्रमाणाचा वापर करुन बोअर ब्लास्टिंग करणाऱ्या संबंधित दोषी ठेकेदार कंपनीवर कारवाई करुन बोअर ब्लास्टिंगमुळे नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या टप्पा-१ अंतर्गत उलवे टेकडीच्या सपाटीकरणाचे काम सुरु आहे. सपाटीकरणासाठी तथा दगड फोडण्यासाठी नियंत्रित ब्लास्टींग करण्यात येत आहे. सदर ब्लास्टींगच्या कामावर देखरेख करण्यासाठी केंद्रीय खाण आणि इंधन संशोधन संस्था (CIMFR) या संस्थेची नेमणूक सिडकोमार्फत करण्यात आली आहे. सदर संस्थेमार्फत ब्लास्टींगची पूर्वतयारी तिव्रतेच्या मानकाची खात्री करुन परवानगी देण्यात येते. वहाळ ग्रामपंचायतीकडून प्राप्त तक्रारीची सिडकोने दखल घेतली असून उक्त CIMFR संस्थेस वहाळ गावाजवळील मैदानात Seismograph बसवून कंपन व आवाजाबाबतचे प्रत्येक ब्लास्टींगचे परीक्षण करण्यात येते. उक्त केंद्रीय खाण व इंधन संशोधन संस्थेच्या अहवालानुसार विमानतळ प्रकल्पासाठी करण्यात येत असलेली ब्लास्टिंग कंपने मर्यादापातळीत असल्याने वहाळ ग्रामपंचायत हद्दीतील घरांना धोका संभवत नाही, असे त्यामध्ये नमूद केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या चेंबूर (प.) शाखेची जागा ग्रंथसंग्रहालयास उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४४) * १५२२२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या चेंबूर (प.) येथील शाखेची जागा बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिरंगाईमुळे ग्रंथसंग्रहालयाच्या ताब्यात मिळाली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भांत म्हाडाने इमारत क्र. १६८ ए मधील जागा ही मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयासाठी आरक्षित असल्याचे कळवूनही महानगरपालिका याकडे गांभीर्याने लक्ष देत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुनर्विकासानंतर सदर इमारतींत वास्तव्यास असलेल्या भाडेकरुंनी ग्रंथसंग्रहालयाच्या जागेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा मंडळाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या चेंबूर (प.) शाखेची जागा ग्रंथसंग्रहालयास उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) "ग्रंथसंग्रहालयाला वनवास-चेंबूरमधील म्हाडा इमारतीतील शाखेसाठी १४ वर्षांपासून लढा" अशा आशयाची बातमी दिनांक १७/१०/२०२२ रोजीच्या महाराष्ट्र टाईम्स या स्थानिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती. तथापि, याबाबतची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

टिळक नगर, चेंबूर वसाहतीमधील टिळक नगर पोलीस स्टेशन समोर सी.टी.एस. क्र. ३२ (भाग) येथे सुमारे २३१७.८९ चौ.मी. भूखंडावर कार्यालयीन इमारत क्रमांक १६, १७ व १८ होत्या. सदर कार्यालयीन इमारतीमधील एक गाळा म्हाडा मार्फत मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयास भाड्याने देण्यात आला

होता. सदर भूखंडाच्या काही भागावर डी.पी. लायब्ररीचे आरक्षण असल्याने या इमारतींचा पुनर्विकास करण्याच्या प्रस्तावास मंजूरी देताना बृहन्मुंबई महानगरपालिकेने, त्याबदल्यात १९५.८७ चौ.मी. चे बांधिव क्षेत्रफळ महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्याची अट "अमान्यतेची सूचना (आय.ओ.डी.)" मध्ये अंतर्भुत केली होती.

त्यानुसार, विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतूदीनुसार समायोजन आरक्षणांतर्गत सार्वजनिक ग्रंथालय/वाचनालयासाठी सदर जागा म्हाडामार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाली आहे. सदर जागा मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची नाही.

(२) हे खरे नाही.

सदर जागा मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयासाठी आरक्षित असल्याबाबत म्हाडा प्राधिकरणाने कोणताही पत्रव्यवहार केला नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

परंतु, म्हाडा प्राधिकरणाने दिनांक २३/०७/२०२१ व ०९/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये, टिळक नगर, चेंबूर येथील इमारत क्र. १६८ ए मधील ग्रंथालयासाठी राखीव असलेले व सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात असलेले बांधकाम क्षेत्र मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयास महानगरपालिकेच्या विहित प्रक्रियेद्वारे वितरित करण्याबाबत शिफारस केली आहे.

(३) पुनर्विकासानंतर सदर इमारतींत वास्तव्यास असलेल्या भाडेकरुंनी ग्रंथसंग्रहालयाच्या जागेसाठी बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच म्हाडाकडे पाठपुरावा केला नाही.

परंतु, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या वतीने बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच म्हाडाकडे पाठपुरावा करण्यात आला आहे.

(४) सदर जागेबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उप आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक अभियंता, म्हाडा (कुर्ला विभाग) व मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे प्रमुख कार्यवाहक तसेच पदाधिकारी यांच्यासमवेत दिनांक २२/११/२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये झालेल्या चर्चेनुसार, सदर जागा विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतूदीनुसार समायोजित आरक्षणांतर्गत सार्वजनिक ग्रंथालय/वाचनालयासाठी महानगरपालिकेस प्राप्त झाली असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २३/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये कार्यवाहक, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय यांना कळविले आहे.

सदर जागेवर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने तात्पुरत्या स्वरुपात स्थानिक विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वरोरा नगरपरिषद (जि.चंद्रपूर) अंतर्गत नवीन पाण्याची टाकी बांधण्याचे काम अपूर्ण असल्याबाबत

**(४५) * १५५९४ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा नगरपरिषद अंतर्गत नवीन पाण्याच्या टाकीच्या बांधकामाचे रुपये १ कोटी ९६ लक्षचे कंत्राट अमरावती येथील साईनाथ कन्स्ट्रक्शन कंपनीला देण्यात आले असून करारनाम्याप्रमाणे

कंपनीने एका वर्षात पाण्याची टाकी बांधून पूर्ण करणे आवश्यक असताना दीड वर्षाचा कालावधी होऊनही काम पूर्ण झाले नसल्याचे दिनांक ३ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कंत्राटदारावर कारवाई करुन पाण्याच्या टाकीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) • वरोरा नगरपरिषदेने सन २०१९ मध्ये वैशिष्ट्यपूर्ण योजना निधीतून पाण्याची टाकी बांधकाम करण्याचा निर्णय घेतला असून याबाबत रुपये १,४५,४६,४८०/- किंमतीची तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर नगरपरिषदेने निविदा प्रक्रिया राबवून साईनाथ कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निवड केली आहे.
- त्यानुसार नगरपरिषदेने निविदाकारासमवेत करारनामा करुन दिनांक ८ एप्रिल, २०२१ रोजी कामाचे आदेश दिले आहेत. त्यानुसार कामाच्या आदेशानुसार काम पूर्ण करण्याचा कालावधी एक वर्षाचा होता.
- दरम्यान विश्वेश्वरय्या राष्ट्रीय प्रौद्योगिक संस्था, नागपूर यांच्याकडून कामाचे संरचनात्मक चित्र (Structural Design) याबाबतची मान्यता दिनांक ३ फेब्रुवारी, २०२२ रोजी प्राप्त झाली असून त्यानंतर कंत्राटदाराने मार्च, २०२२ पासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली आहे.
- कंत्राटदाराने नोव्हेंबर, २०२२ पर्यंत फाऊंडेशनचे काम पूर्ण करुन त्यावर १२ कॉलमचे बांधकाम केले आहे. उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.
- दरम्यानच्या कालावधीत कामाच्या विलंबाची कारणे विचारात घेऊन नगरपरिषदेने कामास दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत मुदतवाढ दिली असून कंत्राटदाराने नगरपरिषदेकडे लेखी निवेदन केल्यानुसार मे, २०२३ पर्यंत काम पूर्ण होईल, असे त्यांनी हमीपत्र दिले आहे.
- दरम्यान विहित कालावधीमध्ये काम पूर्ण होण्याची शक्यता दिसून न आल्याने नगरपरिषदेने कंत्राटदारास दिनांक १ जानेवारी, २०२३ पासून करारनाम्यातील तरतूदीनुसार निश्चित केलेल्या दंडाच्या दुप्पट दंड आकारण्याचा दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी ठराव केला असून सदर बाब कंत्राटदारास दिनांक १६ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विद्याविहार (मुंबई) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या विभागीय कार्यालयाच्या इमारतीचा पुनर्विकास करण्याबाबत

**(४६) * १५८४९ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन महामंडळाच्या विद्याविहार (मुंबई) येथील विभागीय कार्यालयाच्या इमारतीला तडे जाऊन खिडक्या तुटल्याने दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्याविहार येथील परिवहन महामंडळाचा दहा एकर भूखंड असून विभागीय कार्यालयाची इमारत ५० वर्षे जुनी असतानाही इमारतीचा पुनर्विकास न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्य परिवहन महामंडळाच्या विद्याविहार येथील विभागीय कार्यालयाच्या इमारतीचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अशा आशयाची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे.
(२), (३) व (४) सदर इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडीट चे आदेश देण्यात आले आहेत.

-----------------

## राज्यात प्लास्टिक पिशव्यांवर घातलेल्या निर्बंधाची कडक अंमलबजावणी करण्याबाबत

**(४७) * १५९३१ डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय प्रदूषण नियंत्रण बोर्डाकडे प्लास्टिक कचऱ्याच्या पध्दती लावण्यासंदर्भात कृती योजना सादर न केल्यामुळे राज्याला दरमहा रुपये १ कोटींचा दंड भरावा लागणार असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात प्लास्टिक पिशव्या वापरण्यावर बंदी असतानाही दुकानदारांकडून पातळ प्लास्टिकच्या पिशव्या आणि इतर प्लास्टिकच्या वस्तूंचा साठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्लास्टिक पिशव्यांवर निर्बंध आणून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि, एकल वापर प्लास्टिक अधिसूचनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कृतीआराखडा तयार केला असून दिनांक ०८ फेब्रुवारी,२०२२ रोजी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाला सादर केला आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकोल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवणूक), अधिसूचना, दिनांक २३,मार्च २०१८ रोजी प्रसिध्द केली आहे. ज्यामध्ये दिनांक ११ एप्रिल, २०१८, दिनांक ३० जून, २०१८, दिनांक १४ जून, २०१९, दिनांक २८ मार्च, २०२२, दिनांक १५ जुलै, २०२२ आणि दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ च्या अधिसूचनेनुसार सुधारणा करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर विविध विभागांमार्फत कारवाई

करण्यात येते. सन २०२१-२०२२ या काळात एकूण ४९०३०४ आस्थापनांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व स्थानिक स्वराज्य संस्था यांचेमार्फत पाहणी करण्यात आली. त्यापैकी १५७७२ उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून एकूण रुपये १.७५ कोटी इतका दंड वसूल करण्यात आला असून ४३.३९४ मे. टन एकल वापर प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.) दिनांक ०१ जुलै २०२२ पासून केंद्र शासनाने एकल वापर प्लास्टिक बंदीची अधिसूचना जारी केल्यापासून ते ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत करण्यात आलेली कारवाई पुढीलप्रमाणे-

१) तपासणी करण्यात आलेल्या आस्थापनां: २१८४७१,

२) उल्लंघन नोंदवले: १८०१६,

३) एकूण प्लास्टिक जप्त: ९६.४७७ टन,

४) एकूण दंड रुपये २,२१,४३,३८१/-

५) एकूण ०९ दोषी उद्योगांना उत्पादन बंद करण्याचे निर्देश जारी करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांच्या नियमित/कालबध्द पदोन्नतीबाबत

**(४८) * १५२१२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील कनिष्ठ लिपिक, लेखा परीक्षा व लेखा सहायक पदावरील मुख्य लिपिक/वरिष्ठ लेखा परीक्षा व लेखा सहायक पदांच्या पदोन्नतीसाठी खात्यांतर्गत परीक्षा उत्तीर्ण होणार नाहीत/परीक्षा देऊ शकणार नाहीत, या सर्व कर्मचाऱ्यांना राज्य शासनाच्या धोरणानुसार कनिष्ठ लिपिक, लेखा परीक्षा व लेखा सहायक पदावरील सेवेची १० वर्षे पूर्ण झाल्यानंतर नियमित/ कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय असेल याबद्दल दि म्युनिसिपल युनियन यांच्यासोबत झालेल्या बैठकीत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी सहमती दर्शवली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कर्मचाऱ्यांची पदोन्नती व त्यांच्या अन्य मागण्यांबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) सदर प्रकरणी दिनांक २४/०६/२०२२ रोजी लोकप्रतिनिधी व दि म्युनिसिपल युनियन यांच्यासमवेत खालील मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली :-

- दिनांक ०१/०३/२०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्याने लिपिक वा तत्सम पदावर सलग नियमित किमान १५ वर्षांची सेवा पूर्ण केली असल्यास अथवा कर्मचाऱ्याच्या वयाची ५० वर्षे पूर्ण झाली असल्यास, यापैकी जे नंतर घडेल त्यानंतर लगतच्या दिनांकापासून त्या कर्मचाऱ्यांना मुख्य लिपिक आणि वरिष्ठ लेखा परीक्षा व लेखा सहाय्यक या पदावर पदोन्नतीकरीता खात्यांतर्गत परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येते, तसेच अशा कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या कालबध्द पदोन्नतीच्या परिपत्रकांतील अटींची पूर्तता करणेसापेक्ष कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय आहे.

- बृहन्मुंबई महानगरपालिकेतील लिपिक वा तत्सम पदावरील कर्मचाऱ्यांना नियमित पदोन्नती देण्यासाठी किमान सेवा १५ वर्षे ऐवजी १० वर्षे करावयाची असल्यास, याबाबत आवश्यक त्या बाबींची पडताळणी केल्यानंतर निर्णय घेण्यात येणार आहे.
- लिपिक व तत्सम वर्गातील कर्मचाऱ्यांना मुख्य लिपिक या पदाची पदोन्नतीची संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने विद्यमान ७५:२५ या गुणोत्तराऐवजी ५०:५० गुणोत्तर म्हणजेच ५०% मुख्य लिपिक (अर्हताधारक) व ५०% मुख्य लिपिक (अर्हतारहित) याप्रमाणे गुणोत्तर निश्चित करण्याची बाब तत्वत: मान्य करण्यात आली. तथापि, याबाबत अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने पडताळणी केल्यानंतर धोरण निश्चित करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये मुख्याध्यापकांची नेमणूक, शिक्षकांची भरती व मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४९) * १५५५६ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याकरीता दोन वेळा निविदा काढूनही प्रतिसाद मिळाला नसल्याचे तसेच महानगरपालिकेच्या २९ शाळांमध्ये मुख्याध्यापक पद रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईतील महानगरपालिकेच्या कोपरखैरणे येथील सीबीएसई बोर्डाच्या शाळेतील १२५० विद्यार्थ्यांसाठी केवळ १० शिक्षक कार्यरत असल्याने कार्यरत शिक्षकांवर कामाचा ताण वाढत असल्यामुळे शिक्षकांची रिक्त पदे भरण्याकरीता पालकांनी आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचेकडे तक्रार केल्याचे तसेच ऐरोली येथील महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील शिक्षकांची भरती करण्याकरीता पालकांनी आंदोलने काढल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेने स्कूल व्हिजन राबवून उत्तम इमारती बांधल्या असून विद्यार्थ्यांसाठी पुरेसे शिक्षक आणि मूलभूत सोयीसुविधा सर्व शाळांमध्ये न देण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळांमध्ये मुख्याध्यापकांची नेमणूक, शिक्षकांची भरती व मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

- नवी मुंबई महानगरपालिका प्राथमिक शाळांतील रिक्त २९ मुख्याध्यापक पदांवर पदोन्नती देण्याचा प्रस्ताव पदोन्नती समितीपुढे सादर करण्यात आलेला आहे.
- मुख्याध्यापक पदोन्नतीची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून, लवकरच मुख्याध्यापक पदावर पदोन्नती देण्यात येणार आहे.

(२) होय, हे खरे आहे.

- यासंदर्भात पालकांच्या तक्रारी महानगरपालिकेस प्राप्त झाल्या आहेत.
- कोपरखैरणे येथील सीबीएसईच्या शाळेत १२५० विद्यार्थी शिकत आहेत. कोविड-१९ कालावधीमध्ये बऱ्याच पालकांचे रोजगार गेल्याने खाजगी शाळांतील पालकांनी आपल्या पाल्याचे प्रवेश महानगरपालिकेच्या शाळांमध्ये घेतल्याने महानगरपालिकेच्या शाळांची पटसंख्या वाढलेली आहे. पटसंख्या वाढीमुळे शिक्षकांची कमतरता दिसून येत आहे.
- या शाळेसाठी शिक्षक भरती पवित्र पोर्टलद्वारे करण्यात येते. शिक्षकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, याकरीता बाह्यसंस्थेद्वारे तात्पुरत्या स्वरूपात शिक्षक भरती करणेसाठी, नवी मुंबई महानगरपालिकेने निविदा प्रसिध्द केलेली आहे. सदर निविदा प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे.
- याशिवाय, शिक्षण विभागासाठी शिक्षक उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आकृतिबंध तयार करण्याची प्रक्रिया शासन स्तरावर सुरू आहे.

(३) व (४) • नवी मुंबई महानगरपालिकेने ‘शाळा व्हिजन’ कार्यक्रम हाती घेऊन, महानगरपालिकेच्या सर्व शाळा इमारती सुसज्ज व अद्ययावत बांधलेल्या आहेत. तसेच, अनेक सोयी-सुविधा विद्यार्थ्यांना देण्यात येतात.

- तथापि, विद्यार्थी संख्येत कोविड-१९ नंतरच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने शिक्षकसंख्या कमी दिसून येते.
- मात्र, पवित्र पोर्टल तसेच, बाह्यसंस्थेद्वारे तात्पुरते शिक्षक उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. याशिवाय, नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागासाठी शिक्षक उपलब्ध होण्यासाठी आकृतिबंध तयार करण्यात येत असून, त्याबाबत कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत शासकीय वसतिगृहातील भोजन पुरवठ्याचे कंत्राट स्थानिक महिला बचत गट, अनुसूचित जातीच्या संस्थांना देण्याबाबत

**(५०) * १६२०२ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गत शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या भोजनासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांना प्रती महिना रुपये २००० ते ३००० प्रमाणे खर्च करण्यात येत असून वसतिगृहात जेवण पुरवठा करण्याचे कंत्राट स्थानिक महिला बचत गट, अनुसूचित जातीच्या संस्थांना प्राधान्याने देण्यात येत होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२२-२३ मध्ये भोजनासाठी होणाऱ्या खर्चात दुपटीने वाढ होऊन भोजन पुरवठ्याचे कंत्राट स्थानिक महिला बचत गट, अनुसूचित जातीच्या संस्थांना न देता राज्यस्तरावर एकाच निविदाकारास देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामाजिक न्याय विभागांतर्गत वसतिगृहात भोजन पुरविण्याचे कंत्राट महिला बचत गट व अनुसूचित जातीच्या संस्थांना देण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने भोजन पुरवठ्याचे कंत्राट राज्यस्तरावर न देता सदर कंत्राट स्थानिक महिला बचत गट, अनुसूचित जातीच्या संस्थांना प्राधान्याने देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक २० सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये शासकीय वसतिगृहाच्या भोजन ठेक्यासाठी स्थानिक महिला बचत गट, अनुसूचित जातीच्या महिला बचत गट, अनुसूचित जातीच्या सहकारी संस्था देण्याकरीता प्राधान्य देण्यात आलेले होते.
(२) नाही.
(३) होय.
(४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत शासकीय वसतिगृहात भोजन पुरवठा करण्यासाठी राज्यात एकसमान ई-निविदा प्रक्रिया राबविण्याबाबतचा जाणीवपूर्वक निर्णय दिनांक २४ जून, २०२२ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. सदर शासन निर्णयामधील तरतूदीनुसार पुढील प्रक्रिया न्यायालयीन प्रकरणाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(५१) * १५६५१ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील रस्ता रुंदीकरण, नदीपात्र, बी.आर.टी., आरक्षणात असलेली बांधकामे तीन महिन्यापूर्वी निष्कासित करण्यात आली असून महानगरपालिका आयुक्तांची बदली होताच शहरातील बांधकामे निष्कासित करण्यात आलेल्या जागेवर पुन्हा बांधकामे उभी राहत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मोशी ते भोसरी, जगताप डेअरी ते वाकड, भोंडवे कॉर्नर ते रावेल, सांगवी, थेरगाव, निगडी, रुपीनगर, चिखली, चिंचवड या रस्त्यांवर पुन्हा सर्रासपणे अनधिकृत बांधकाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नदीपात्र, रस्ता रुंदीकरणाच्या कामास अडथळा निर्माण होणाऱ्या शहरातील टपरी, पत्र्याचे शेड इ. अनधिकृत बांधकामांना सहकार्य करणाऱ्यांविरुध्द कारवाई करुन अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील रस्ता रुंदीकरण, नदीपात्र, बी.आर.टी. आरक्षणातील, भोसरी, जगताप डेअरी ते वाकड, भोंडवे कॉर्नर ते रावेल, निगडी, चिखली इत्यादी परिसरात अनधिकृत

बांधकामे/पत्राशेड सरसकट निष्कासन कारवाई करण्याकरीता महानगरपालिकेमार्फत दिनांक ०६/०६/२०२२ ते दिनांक ११/०६/२०२२ या कालावधीत विशेष मोहिम राबवून अनधिकृत बांधकामे/पत्राशेड निष्कासित करण्यात आलेली आहेत.

कालांतराने निष्कासित केलेली सदर अनधिकृत बांधकामे काही ठिकाणी पुन्हा उभारली गेली असल्याचे महानगरपालिकेस निदर्शनास आले असता सदर उभारलेली अनधिकृत बांधकामे/पत्राशेडवर दिनांक १०/११/२०२२ ते दिनांक ११/११/२०२२ या कालावधीत महानगरपालिकेमार्फत विशेष मोहिम राबवून अनधिकृत बांधकामे/पत्राशेड निष्कासित करण्यात आली असल्याचे महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(३) पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे प्रभावीपणे नियंत्रण आणण्यासाठी महानगरपालिकेमार्फत क्षेत्रिय स्तरावर धडक कारवाई पथक स्थापन करुन बीट निरीक्षकाची नेमणूक करण्यात आली आहे. बीट निरीक्षक यांना नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रात गस्त घालून अनधिकृत बांधकामांचा शोध घेवून अनधिकृत बांधकाम धारकास MRTP/MMC मधील कलमान्वये नोटीस देवून सदर नोटीसीचा कालावधी संपल्यानंतर नियमानुसार धडक कारवाई पथकामार्फत कारवाई करण्यात येते. सदरची कारवाई दैनंदिन सुरु असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या प्रारुप विकास आराखड्यात सिडकोच्या मालकीचे भूखंड आरक्षित केल्याबाबत

**(५२) * १६०७५ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या प्रारुप विकास आराखड्यात सिडकोच्या मालकीच्या ६२५ भूखंडावर आरक्षण टाकण्यात आले असून उपरोक्त पैकी सुमारे ५८० भूखंड हे सिडकोने विक्रीसाठी राखीव ठेवले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडकोच्या मालकीच्या भूखंड आरक्षित केल्यामुळे सिडको प्रशासनाला सुमारे रुपये ३० हजार कोटींचे नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सिडको मालकीच्या भूखंडावरील आरक्षणामुळे नवी मुंबईतील नागरी कामांवर परिणाम होऊ नये याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२), (३) व (४) सिडकोच्या मालकीच्या भूखंडावर जरी आरक्षण दर्शविण्यात आले असले तरी देख़ील नियोजन प्राधिकरण म्हणजे नवी मुंबई महानगरपालिकेस त्याचे भूसंपादन करावे लागेल अथवा सिडको समायोजित आरक्षण विकासाच्या पर्यायाचा वापर करुन त्याचा विकास करु शकते, म्हणजेच हे सर्व भूखंड नवी मुंबई महानगरपालिकेस मोफ़त उपलब्ध होणार नाही आणि त्यामुळे सिडकोचे ३० हजार कोटीचे नुकसान होईल असे म्हणणे उचित नाही.

तसेच, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमातील तरतूदीनुसार प्रत्येक शहराची विकास योजना तयार करणे संबंधित नियोजन प्राधिकरणावर बंधनकारक आहे. सदर अधिनियमाचे कलम २२ मध्ये नमूद केल्यानुसार जनतेकरीता सार्वजनिक सोयी सुविधां इत्यादीसाठी जमीन राखून ठेवणेसंबंधी तरतूदी असून त्यानुसार विकास योजना तयार करताना सदर बाबीची पूर्तता करण्यासाठी सार्वजनिक प्रयोजनार्थ वापरासाठी शहरातील जमिनींवर आरक्षणे प्रस्तावित करण्यात येतात. तथापि, महापालिकेने प्रस्तावित केलेल्या आरक्षणांसंबंधी संबंधित जमीनमालक, नवनगर नियोजन प्राधिकरण इत्यादींना हरकती/सूचना दाखल करण्याचा पर्याय उपलब्ध असून प्रारुप विकास योजनेवर प्राप्त होणाऱ्या हरकती/सूचनाकारांना नियोजन समितीने सुनावणी देऊन समितीचे अभिप्राय घेऊन नियोजन प्राधिकरणाने प्रारुप विकास योजनेत आवश्यक सुधारणा करुन कलम ३० अन्वये शासनास मंजूरीसाठी सादर करण्याची तरतूद आहे. त्यानुसार शासनास प्राप्त होणाऱ्या प्रारुप विकास योजनेस कलम ३१ अन्वये मंजूरी देण्याचे अधिकार शासनास आहेत.

नवी मुंबई महापालिकेने प्रारुप विकास आराखड्यात सार्वजनिक प्रयोजनार्थ आरक्षण प्रस्तावित करणे ही बाब नियमास अनुसरुनच आहे. सदर आरक्षणे खाजगी, सरकारी अथवा निमसरकारी प्राधिकरणांच्या जमिनींवर दर्शविण्यास प्रत्यवाय नाही. तथापि, खाजगी जमीनमालक अथवा सिडकोच्या जमिनींवर सार्वजनिक प्रयोजनार्थ प्रस्तावित केलेल्या आरक्षणासंबंधी विहित कालावधीत हरकती/ सूचना दाखल करण्याचा हक्क संबंधितांना प्राप्त होतो. तसेच मंजूर विकास योजनेत आरक्षित क्षेत्र महापालिकेस हस्तांतरीत करण्यापोटी जमीनमालकास मोबदला देण्याची तरतूद आहे.

-----------------

## पनवेल महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या गावातील मालमत्ता कर कमी करण्याबाबत

**(५३) * १५४०० श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल महानगरपालिकेत समाविष्ट गावांनी व सिडको वसाहतीधारकांनी वाढीव मालमत्ता कर आकारणेकरीता विरोध केला असून मालमत्ता कर रद्द करावा आणि सन २०१४ पूर्वी जो ग्रामपंचायत कर अस्तित्वात होता तोच कर आकारावा अशी मागणी ११ गावे पंचक्रोशी संघर्ष समितीने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिडको आणि समाविष्ट गावांनी थकबाकीसह वाढीव मालमत्ता कर भरण्यास विरोध केला असून पनवेल महानगरपालिकेने दिलेल्या नोटीसीमध्ये नमूद मालमत्ता कर भरणे नागरिकांच्या आवाक्याबाहेर असल्यामुळे तो भरता येऊ शकत नसल्याने महानगरपालिकेने मालमत्ता कर वाढवून सन २०१६ ते २०२२ पर्यंत भरण्याबाबत कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या गावांचा पनवेल महानगरपालिकेमध्ये समावेश झालेला आहे त्या गावांमध्ये सन २०१४ पूर्वी ग्रामपंचायत कर अस्तित्वात होता तोच ग्रामपंचायत कर आकारण्यात यावा, अशी मागणी मालमत्ताधारकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पनवेल महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या गावातील मालमत्ता कर कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, पनवेल महानगरपालिका क्षेत्रात सर्वसाधारण सभा ठराव दिनांक १७/०१/२०१९ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या मंजूरीस अनुसरुन महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्तांना महानगरपालिकेच्या स्थापनेपासून पूर्वलक्षी प्रभावाने मालमत्ता कर आकारणी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे ४ रिट याचिका व २ जनहित याचिका दाखल करण्यात आल्या असून सदर प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट आहे. तथापि, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या पुढील निर्देशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याबाबत

**(५४) * १५२७४ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सचिन अहिर : तारांकित प्रश्न क्रमांक ११७९० ला दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे वास्तव्य असलेल्या घाटकोपर येथील चिराग नगर (मुंबई) येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास करुन तेथील अण्णाभाऊ साठे यांच्या घरांचे जतन करुन त्यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचा निर्णय सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकासाठी रुपये १७० कोटी खर्च येणार असून त्याबाबतचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून शासनाचे (गृहनिर्माण विभाग) मान्यतेसाठी सादर केला असल्याचे दिनांक १६ जून, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्मारक बांधकामाबाबतची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे काय, स्मारकाचे बांधकाम केव्हा पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे मुंबईत आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर स्मारकासाठी ढोबळमानाने प्रथमदर्शनी रुपये १६९.५४ कोटी इतक्या रकमेचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.याबाबात सचिव, सामाजिक न्याय यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १७/१०/२०२२ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीतील निर्देशानुसार सुधारीत प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण दिनांक १२/१२/२०२२ रोजी शासनास सादर केला आहे.

(३) व (४) प्रस्तावित खासगी भूखंडाचे भूसंपादन शासनामार्फत करून तेथे वास्तव्य करीता असलेल्या निवासी व अनिवासी झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्यात येईल. ही प्रक्रिया करून निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल.

सदर स्मारकाच्या बांधकामास सुरूवात झाल्यापासून ३६ महिने अधिक ०४ महिने वाढीव कालावधी असा एकूण ४० महिन्यांचा कालावधी बांधकाम पूर्ण होणेस अपेक्षित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मेट्रो-३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) मधील प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(५५) * १५१६४ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेट्रो-३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) प्रकल्पामुळे काळबादेवी-गिरगाव परिसरातील जुन्या उपकरप्राप्त इमारती बाधित होत आहेत, सदरहू प्रकल्पबाधितांचे योग्य पुनर्वसन करण्यात आलेले नसल्याने प्रकल्पबाधितांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप गिरगाव येथील रहिवाशांनी केले असून दिनांक १८ ऑक्टोबर, २०२२ रोजी रस्त्यावर उतरुन आंदोलन करुन मेट्रो-३ चे काम बंद पाडण्याचा इशारा शासनाला दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेट्रो-३ प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या गिरगाव परिसरातील प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या काय आहेत, सदर मागण्यासंदर्भात शासनाने कोणकोणते निर्णय घेतले आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मेट्रो-३ (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) मधील प्रकल्पबाधितांचे योग्य पुनर्वसन करुन मेट्रो सेवा कार्यान्वित होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

गिरगाव-काळबादेवी येथील प्रकल्पग्रस्तांच्या वतीने विविध मागण्या व प्रश्नांबाबत दिनांक ०३/१०/२०२२ रोजी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांना काळबादेवी कृती समितीने निवेदन दिले आहे.
(२), (३) व (४) मेट्रो-३ प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्ताच्या वारसदारांना कायमस्वरुपी पुनर्वसनाच्या अनुषंगाने कायद्याप्रमाणे वारसा हक्क प्रमाणपत्र घेण्याची असलेली अटीमध्ये सुट देणे, वाटप प्रमाणपत्र व अंतिम करारपत्रे त्वरीत देणे पुनर्वसन कधी होणार याची अंतिम तारीख जाहीर करणे, प्रकल्पग्रस्ताचे पात्रता व अपात्रता संबंधित म्हाडामार्फत घेतलेले निर्णय त्वरीत रद्द करणे, बृहन्मुंबई महानगरपालिकाकडून करण्यात येणाऱ्या रस्ता रुंदीकरणामुळे विस्तापित होणाऱ्या गाळे धारकांना गाळे वितरित करणे अपात्र प्रकल्पग्रस्तांचा अंतिम निर्णय होईपर्यंत भाडे वितरित करणे, धरमसी इमारतीमधील भाडेकरुंच्या पुनर्वसनाबाबत निर्णय घेणे, चिराबाजार येथील अप्रमाणीत प्रकल्पग्रस्तांना १० टक्के भाडेवाढ देणे, मेट्रो ३ च्या कामामुळे जुन्या इमारतींना तडे जाणे, इत्यादी बाबतचे निवेदनाद्वारे मागण्या करण्यात आल्या आहे.

निवेदनाद्वारे प्राप्त मागण्याच्या अनुषंगाने एमएमआरसीएल मार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

१) पुनर्वसन करावयाच्या इमारतीचे आराखडे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मान्यतेनंतर प्रसिध्द करण्याचे प्रस्तावित आहे.

२) प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या के-२ व के-३ इमारतीचे माहे मे, २०२५ पर्यंत तर जी-३ चे इमारतीचे बांधकाम माहे ऑगस्ट, २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचा मानस आहे.

३) पुनर्वसनासाठी पात्र-अपात्र निश्चितीसाठी "म्हाडा" ची सक्षम प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

४) दादी संतुक लेन रस्ता रुंदीकरणामुळे बाधित होणाऱ्या ८ दुकांनाचे पुनर्वसन बृहन्मुंबई महानगरपालिका व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडमार्फत समन्वयाने करण्यात येणार आहे.

५) अपात्र गाळे धारकासंदर्भात अपिलात असलेल्या प्रकल्पग्रस्तांना अंतिम निर्णय होईपर्यंत प्रकल्पग्रस्तांना भाडे वितरित करण्याचा निर्णय एमएमआरसीएल व्दारे घेण्यात आला आहे. अपात्र ठरविल्यानंतर त्याचे भांडे थाबविण्यात येईल परंतु त्यांचे एमयुटीपी पॉलीसी नुसार कायमस्वरुपी अथवा तात्पुरते पुनर्वसन एमएमआरसीएल द्वारे करण्यात येईल.

६) एमएमआरसीएल कडून कायमस्वरुपी पुनर्वसनाकरीता पुनर्विकसित करण्यात येणाऱ्या इमारतीमध्ये धरमसी इमारतीतील रहिवाशांकरीता म्हाडाच्या प्रमाणित यादीनुसार पुनर्वसन सदनिका बांधण्यात येणार आहेत.

७) मेट्रोच्या कामामुळे प्रकल्पाच्या सभोवताली असलेल्या १०० ते १५० वर्षांपूर्वीच्या इमारतींना जागोजागी आधार देण्यात आला आहे. सदरच्या इमारती जीर्ण अवस्थेत असल्याने व त्याची डागडुजी / दुरुस्ती न केल्याने इमारतीना तडे गेले आहे. मेट्रो प्रकल्पाच्या बांधकामामुळे कोणाताही प्रतिकुल परिणाम इमारतीवर झालेला नाही वा होणार नाही याची दक्षता मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांच्यामार्फत घेण्यात आली आहे.

-----------------

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून (एमपीएससी) गट-ब व गट-क संवर्गाच्या पदांसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेचा अभ्यासक्रम जाहीर करण्याबाबत

**(५६) * १५६१२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून (एमपीएससी) गट-ब व गट-क संवर्गाच्या पदांसाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षेचा अभ्यासक्रम जाहीर करावा, अशी मागणी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे माहे सप्टेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमपीएससीने पुढील वर्षी दिनांक २८ सप्टेंबरला होणाऱ्या स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्रक घोषित केले त्यात गट-ब व गट-क या पदांसाठी होणाऱ्या पूर्व व मुख्य परीक्षेबाबत माहिती दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गट-ब व गट-क संवर्गाच्या पदासाठी विद्यार्थ्यांना तयारी करण्यासाठी पुरेसा वेळ मिळावा, आयोग पूर्ण क्षमतेने चालू राहवा व मुख्यालयाचा प्रश्न मार्गी लागण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोग सांविधानिक दृष्ट्या स्वायत्त संस्था असून आयोगामार्फत परीक्षा प्रक्रिया राबविण्याबाबत धोरण ठरविले जाते. त्यामध्ये शासन स्तरावरुन कोणताही हस्तक्षेप करण्यात येत नाही. याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने महाराष्ट्र राजपत्रित सेवा गट-ब व गट-क करीता अभ्यासक्रम दिनांक १५/११/२०२२ व दिनांक ०५/१२/२०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केला आहे. सदर बदल आयोगाकडून सन २०२३ करीता आयोजित परीक्षांपासून लागू करण्यात येतील.

सद्य:स्थितीत महाराष्ट्र लोकसेवा आयोगातील १ अध्यक्ष व २ सदस्यांची पदे भरलेली आहेत. आयोग पूर्ण क्षमतेने चालू राहण्यासाठी उर्वरित ३ सदस्यांची रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मुख्यालयाच्या इमारत बांधकामास शासन निर्णय दिनांक ९ नोव्हेंबर, २०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्याच्या सीमेवर ट्रक चालकांकडून अवैध मार्गाने पैसे गोळा करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(५७) * १५२७० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मध्यप्रदेश व महाराष्ट्र राज्याच्या सीमेवर ट्रक चालकांकडून लाच स्वीकारतांना तसेच वजन मापात फेरफार करुन वजन वाढवून ट्रक चालकांकडून अवैध मार्गाने पैसे गोळा करत असल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी आयुक्त, राज्य परिवहन महामंडळ व सचिव, परिवहन विभाग यांचेकडे दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२ रोजी लेखी स्वरुपात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत या प्रकल्पाचे सेवापूरवठादार मे. महाराष्ट्र बॉर्डर चेकपोस्ट नेटवर्क लि. यांना त्यांनी सीमा तपासणी नाका, पुर्णांड जि.जळगाव येथे नेमलेल्या खाजगी कंत्राटदाराची सखोल चौकशी करुन कारवाई करण्याबाबत तसेच सीमा तपासणी नाका, पुर्णांड येथे कार्यरत असणाऱ्या वजन काटयांचे कॅलीब्रेशन करुन घेण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच, याप्रकरणी उचित कार्यवाही करण्याबाबत उपअधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव यांना परिवहन आयुक्त कार्यालयाकडून पत्राव्दारे कळविण्यात आले आहे.

सीमा तपासणी नाक्यांवरील वजन काट्यांची तपासणी आठवड्यातून एकदा करण्यात यावी, याबाबत संबंधित क्षेत्रिय कार्यालयांना दिनांक १३/१०/२०२२ च्या पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच नियंत्रक वैद्यमापन शास्त्र यांना दिनांक १३/१०/२०२२ च्या पत्रान्वये सर्व सीमा तपासणी नाक्यावरील कार्यरत असणाऱ्या वजन काट्यांचे कॅलिब्रेशन झाले नसल्यास कॅलिब्रेशन प्रक्रिया ७ दिवसात

करुन घ्यावी व कॅलिब्रेशन केल्याची तारीख सीमा तपासणी नाका येथे दर्शनी भागी ठळकपणे प्रदर्शित करावी असे परिवहन आयुक्त कार्यालयाच्या स्तरावरुन कळविण्यात आले आहे.

त्यानुसार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगाव यांनी सीमा तपासणी नाका कर्की, ता.मुक्ताईनगर व सीमा तपासणी नाका, पुर्णांड येथील सर्व वजन काट्यांचे वैद्यमापन शास्त्र विभाग, रावेर यांच्याकडून रिकॅलिब्रेशन करण्यात आले असून वैध प्रमाणपत्रे सीमा तपासणी नाक्यावर दर्शनी भागावर प्रदर्शित करण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालाड (मुंबई) येथील पोलिसांचा गृहप्रकल्प मार्गी लावण्याबाबत

**(५८) * १६३९९ श्री.नागोराव गाणार, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादासाहेब गायकवाड नगर, मालाड (मुंबई) येथील जमिनीवर पोलिसांच्या रखडलेल्या गृहनिर्माण प्रकल्पाचे काम सुरु असतानाच बृहन्मुंबई महानगरपालिकेने थकीत मालमत्ता कर भरण्याची मागणी केली असून सदरहू कर भरेपर्यंत पोलिसांच्या गृहनिर्माण प्रकल्पाच्या करारनाम्याच्या कागदपत्रांची नोंदणी करु नये असे निर्देश बृहन्मुंबई महानगरपालिकेने निबंधकांच्या विविध कार्यालयांना दिले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदरहू निर्देश निबंधकांना दिल्यामुळे पोलिसांचा गृहनिर्माण प्रकल्प अडचणीत आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मालाड येथील पोलिसांचा गृहप्रकल्प मार्गी लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) सदर प्रकल्प सर्व्हे क्रमांक २६३, सी.टी.एस. क्रमांक ३५२५(भाग) गायकवाड नगर, मालवणी, मालाड (प.) या भूखंडावर उभारण्यात येत आहे. सदर भूखंड म्हाडा प्राधिकरणाच्या अखत्यारीत असून तो महाराष्ट्र पोलीस कोऑपरेटीव्ह हाऊसिंग फेडरेशन लिमिटेड यांना भाडेपट्टयाने देण्यात आला आहे. सदर भूखंड महाराष्ट्र पोलीस कोऑपरेटीव्ह हाऊसिंग फेडरेशन लिमिटेड यांच्या नावे करनिर्धारित आहे.

सदर मालमत्तेचे वर्णन मोकळी जमीन (निवासी) म्हणून दिनांक ०१/०४/२००० पासून करनिर्धारित आहे. आजमितीस सदर मालमत्तेच्या मालमत्ता कराची थकबाकी रुपये २,६४,४०,७६९ /- इतकी आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २३/१२/२०२० रोजी रुपये १,०४,१०,२९४/- इतका कर भरण्याकरीता २१ दिवसांची नोटीस देण्यात आली होती. पक्षकाराने मालमत्तेचा कर भरणा न केल्यामुळे मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २०३ अन्वये संपूर्ण भूखंडावर दिनांक ०१/०२/२०२१ रोजी अटकावणीची कारवाई करण्यात आली. बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ११/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये निबंधकांच्या विविध कार्यालयांना, उपरोक्त भूखंडावर बांधण्यात येणाऱ्या सदनिकांच्या खरेदी / विक्री यांची नोंदणी करु नये असे निर्देश दिले आहेत.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक ०१/०२/२०२१ रोजी केलेल्या अटकावणीच्या कारवाईविरुध्द महाराष्ट्र पोलीस कोऑपरेटीव्ह हाऊसिंग फेडरेशन लिमिटेड यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्रमांक (एल) ३१८३८/२०२२ दाखल केली. त्यानुषंगाने मा.न्यायालयाने दिनांक १२/१०/२०२२ रोजीच्या सुनावणीमध्ये खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत :-

- महाराष्ट्र पोलीस कोऑपरेटीव्ह हाऊसिंग फेडरेशन लिमिटेड यांनी दंडासह थकीत मालमत्ता कराच्या रकमेपैकी ८० टक्के रक्कम म्हणजेच रुपये २,२८,०२,०००/- महानगरपालिकेकडे भरणे आवश्यक आहेत.
- महाराष्ट्र पोलीस कोऑपरेटीव्ह हाऊसिंग फेडरेशन लिमिटेड यांनी त्यापैकी रुपये २०,००,०००/- एवढी रक्कम एका आठवड्यामध्ये, रुपये २०,००,०००/- एवढी रक्कम दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत व उर्वरित रक्कम दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे जमा करावी.
- सदर रक्कम महानगरपालिकेकडे जमा करण्यास असमर्थ ठरल्यास महाराष्ट्र पोलीस कोऑपरेटीव्ह हाऊसिंग फेडरेशन लिमिटेड यांना सदनिका क्रमांक १६०६, १७०६, १८०६ आणि १९०६ च्या खरेदी विक्रीचा व्यवहार करता येणार नाही.

मा.न्यायालयाच्या उपरोक्त आदेशानुसार महाराष्ट्र पोलीस कोऑपरेटीव्ह हाऊसिंग फेडरेशन लिमिटेड यांनी दिनांक १८/१०/२०२२ रोजी रुपये २०,००,०००/- चा भरणा महानगरपालिकेकडे केला. महाराष्ट्र पोलीस कोऑपरेटीव्ह हाऊसिंग फेडरेशन लिमिटेड यांचेमार्फत उर्वरित रक्कम अद्यापि महानगरपालिकेस प्राप्त झाली नसल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

महानगरपालिकेने मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम २०३ अन्वये केलेल्या कारवाईमुळे सदर गृहप्रकल्प विकासासाठी कोणतीही बाधा येत नाही. तथापि, मा.न्यायालयाने दिनांक १२/१०/२०२२ रोजीच्या आदेशान्वये, या प्रकल्पातील केवळ सदनिका क्रमांक १६०६, १७०६, १८०६ आणि १९०६ संबंधी व्यवहार करण्यास / हस्तांतरण करण्यास, महाराष्ट्र पोलीस कोऑपरेटीव्ह हाऊसिंग फेडरेशन लिमिटेड यांना दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंत मालमत्ता कराचे अधिदान करण्याच्या अटीसापेक्ष मनाई केली आहे.

सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असून मा.न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील शालेय बस/व्हॅन वाहतूकीच्या नियमांची अंमलबजावणी करण्याबाबत

**(५९) * १६४५३ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय विद्यार्थ्यांसाठी शालेय बस व मारुती व्हॅन बाबत शासनाची नियमावली असूनही मुंबई शहरात नियमांची अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मारुती व्हॅन मध्ये बसण्याची क्षमता ६ ते ७ जणांची असतानाही सदरहू व्हॅन मधून २० ते २५ विद्यार्थ्यांना बसवून सर्रास वाहतूक केली जात असून त्याकडे परिवहन विभागाकडून दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय बस व मारुती व्हॅन मधून क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना बसवून वाहतूक करण्यात येत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा धोका निर्माण झाला असून अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या शालेय बस व मारुती व्हॅन धारकांवर कारवाई करुन शालेय बस/व्हॅन वाहतूकीच्या नियमांची अंमलबजावणी होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) दिनांक ३०/०५/२०२२ रोजी वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली आहे.
(२), (३) व (४) परिवहन विभागाच्या क्षेत्रिय कार्यालयांच्या वायुवेग पथकामार्फत नियमितपणे विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या शालेय बस, स्कूल व्हॅन सह इतर वाहनांची तपासणी करण्यात येते. सदर तपासणीमध्ये दोषी आढळलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येते.

वायुवेग पथकांमार्फत शालेय बस व्हॅन सह इतर वाहनांमध्ये क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी व विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर पुढीलप्रमाणे कारवाई करण्यात आली.

कालावधी: एप्रिल २०२२ ते नोव्हें २०२२

| कार्यालयाचे नाव | दोषी वाहने | एकूण दंड वसुली |
|---|---|---|
| प्रापका मुंबई (मध्य) | १३५ | ५०,५८,०००/- |
| प्रापका मुंबई(पश्चिम) | १४७ | ११,३५,१५६/- |
| प्रापका, मुंबई(पुर्व) | ११८ | ४,४९,१००/- |
| उपप्रापका, बोरीवली | ९८ | १,७५,५००/- |

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात जलयुक्त शिवार योजना पुन्हा सुरु करण्याबाबत

**(६०) * १५४६० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव : तारांकित प्रश्न क्रमांक १२८३८ ला दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बंद असलेली जलयुक्त शिवार योजना पुन्हा सुरु करण्यात येणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ४ जिल्ह्यात कॅग अहवालात जलयुक्त शिवार योजना अपयशी ठरली असून रुपये ९ कोटी खर्च करुनही अपेक्षित पाण्याची पातळी वाढली नसल्याने याप्रकरणी चौकशीचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पाण्याची पातळी वाढविण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) भूजल पातळीतील वाढ किंवा घट हे पर्जन्यमान व त्याची तीव्रता, जलसंधारण व भूजल पुनर्भरण कामामुळे होणारे भूजल पुनर्भरण, मान्सून कालावधीमध्ये पर्जन्यमानात खंड पडल्यास, त्यावेळी पुरक सिंचनाकरीता होणारा भूजल उपसा, मान्सूनोत्तर कालावधीतील भूजल उपसा, विंधन विहिरींद्वारे अतिखोल जलधरातून होणारा भूजल उपसा, सिंचन क्षेत्रामध्ये झालेली वाढ अथवा घट या बाबींवर अवलंबून असते. त्यामुळे, भूजल पातळी वाढविण्यात हे अभियान अपयशी ठरले नसून अनेक गावात भूजल पातळी वाढ़ली आहे. तसेच उपसा वाढला तरी अनेक गावात भूजल पातळी स्थिर आहे. अभियानामुळे पीक पेरा क्षेत्रात वाढ, उत्पादनात वाढ व शेतकऱ्याच्या राहणीमानात वाढ झालेली आहे.

तथापि, महालेखापाल यांच्या अहवालास अनुसरून शासन नियुक्त समितीच्या शिफारशीनुसार संबंधित प्रकरणांची चौकशी सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उस्मानाबाद नगरपरिषद (जि.उस्मानाबाद) अंतर्गत भंगार चोरी प्रकरणातील दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(६१) * १५४८६ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) नगरपरिषद अंतर्गत भंगार चोरी प्रकरणात रुपये ८० ते ८५ लक्षांचे सामान चोरीला गेल्याने कर्मचारी व ठेकेदारांना वाचविण्यासाठी जाणीवपूर्वक अज्ञातांवर गुन्हा नोंद केल्याची घटना दिनांक ७ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद नगरपरिषदेच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनीच संगनमत करुन नगरपरिषदेच्या मालकीची विलगीकरण मशीन, पत्र्याचे शेड व इतर साहित्य चोरी करुन सदर प्रकरण दडपण्यासाठी रुपये १३ हजारांचेच सामान चोरीला गेल्याचा खोटा गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रुपये १३ हजारांचे सामान चोरीला गेल्याची नोंद असताना सामान विकत घेणाऱ्या भंगारवाल्याकडून नगरपरिषदेने रुपये २५ हजार भरुन घेतले असून या प्रकरणी मुख्याधिकारी, उस्मानाबाद नगरपरिषद हे सहभागी ठेकेदार व कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असल्याचा आरोप लोकप्रतिनिधींनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) नगरपरिषद अंतर्गत भंगार चोरी प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशतः खरे आहे,

- उस्मानाबाद नगरपरिषदेअंतर्गत ३ वर्षापूर्वी अतिक्रमण मोहिमेमध्ये जप्त केलेले रुपये १३,५००/- किंमतीचे भंगार साहित्य दिनांक २४ जुलै, २०२२ च्या सुमारास चोरी झाले.
- याबाबत अज्ञात व्यक्तीविरुध्द आनंदनगर पोलीस ठाणे, उस्मानाबाद येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

नगरपरिषदेच्या मालकीचे पत्र्याचे शेड हे कचरा डेपो येथे अस्तित्वात असून, १२ वर्षापूर्वीची विलगीकरण मशीन मोडकळीस आलेली आहे, त्याची चोरी झालेली नाही.

(३) हे खरे नाही,

- उस्मानाबाद नगरपरिषदेच्या आवारातील रुपये १३,०००/- ची साहित्य चोरी आणि अतिक्रमण पथकाकडून जप्त केलेले साहित्य संबंधित व्यावसायिकास परत करण्याकरीता केलेली रुपये २५,०००/- इतकी दंड वसूली हे दोन्ही वेगवेगळे विषय आहेत.
- नगरपरिषदेच्या अतिक्रमण पथकाने जप्त केलेले साहित्य संबंधित व्यावसायिकाच्या दिनांक ०१ ऑगस्ट, २०२२ रोजीच्या मागणी अर्जानुसार रुपये २५,०००/- इतका दंड वसूल करुन परत केले आहे.

(४) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्या दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मुख्याधिकारी, उमरगा नगरपरिषद यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केली असून, चौकशी सुरु आहे.

- सदर चोरी प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुध्द दाखल गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील दिक्षा भूमी विकासाच्या नवीन आराखड्यास मंजूरी देण्याबाबत

**(६२) * १५९७५ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील दिक्षा भूमी विकास आराखड्याकरीता रुपये १९० कोटींचा नवीन आराखडा १५ दिवसात मंजूर केला जाईल, अशी घोषणा मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी दिक्षा भूमीवर आयोजीत ६६ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळयात दिनांक ५ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील नवीन आराखड्यास मंजूरी देण्यात आली आहे काय, त्यात नमूद करण्यात आलेल्या बाबींची थोडक्यात माहिती काय आहे, किती मुदतीत नवीन विकास आराखड्याची मागणी पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, दादर येथील चैत्यभूमी व नागपूर येथील दिक्षाभूमीस “अ” दर्जाच्या धार्मिक स्थळाची मान्यता प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दिक्षा भूमी विकासाच्या नवीन आराखड्यास मंजूरी देण्याबाबत तसेच दादर येथील चैत्यभूमी व नागपूर येथील दिक्षाभूमीस “अ” दर्जाच्या धार्मिक स्थळाची मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) या विकास आराखड्यात प्रामुख्याने दगडी सुरक्षा भिंत, व्यासपीठ, टेहाळणी उंच मनोरे, मध्यवर्ती स्तुपाच्या प्रवेशद्वाराचे विस्तारीकरण, तोरणद्वार, अशोकस्तंभ, प्रसाधन गृहे, अर्थकेंद्र, ॲम्फी थिएटर, प्रदर्शनी हॉल, परीक्रम, द्विस्तरीय सुविधा क्षेत्र, इत्यादींचा अंतर्भाव आहे. याबाबतचा सुधारित

प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून सदर प्रस्ताव उच्चस्तरीय सचिव समितीसमोर सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर (स्मारक) चैत्यभूमी दादर, मुंबई यास तीर्थक्षेत्र "अ" वर्ग दर्जा नगरविकास विभागाच्या दिनांक २/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आला आहे व नागपूर येथील दिक्षाभूमीस "अ" दर्जाच्या धार्मिक स्थळाची मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील दिघी (ता.श्रीवर्धन) आणि बोरली (ता.मुरुड) येथे बहुउद्देशीय निवारा केंद्र उभारण्याबाबत

**(६३) * १६५०५ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणात राष्ट्रीय चक्रीवादळ निवारण कार्यक्रमातून ११ बहुउद्देशीय निवारा केंद्र उभारण्यास गत तीन वर्षापूर्वी मंजूरी देण्यात आली असून रायगड जिल्ह्यातील दिघी (ता.श्रीवर्धन) आणि बोरली (ता.मुरुड) येथे बहुउद्देशीय निवारा केंद्र उभारण्यास मंजूरी मिळाल्यानंतर दोन चक्रीवादळे येऊन गेली तद्नंतरही निवारण केंद्र उभारणीचे काम सुरु झाले नसल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा प्रकारच्या प्रत्येक निवारा केंद्रासाठी रुपये ४ कोटी २२ लाख खर्चाच्या मान्यतेचा शासन निर्णय दिनांक २६ जून, २०१९ रोजी प्रसिध्द करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्ह्यात विविध नैसर्गिक आपत्ती येत असून त्यामध्ये चक्रीवादळे, पूरग्रस्त, दरडग्रस्त तसेच रासायनिक कारखान्यांच्या वसाहतीत वायुगळतीमुळे गावे खाली केली जात असल्याने सदरहू रहिवाशांसाठी पूर्ण सुविधा असलेल्या निवारा केंद्राची गरज भासू शकते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रायगड जिल्ह्यातील दिघी (ता.श्रीवर्धन) आणि बोरली (ता.मुरुड) येथे बहुउद्देशीय निवारा केंद्र उभारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पाअंतर्गत रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पालघर जिल्ह्यांतील ११ ठिकाणी बहुउद्देशीय चक्रीवादळ निवारा केंद्र उभारण्यास आणि त्यासाठी होणाऱ्या रुपये ४२,३९,४७,८१८/- इतक्या खर्चास दिनांक २६ जून, २०१९ रोजीच्या शासन आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पाअंतर्गत रायगड जिल्ह्यामध्ये मौजे दिघी (ता.श्रीवर्धन) आणि मौजे बोरली (ता.मुरुड) येथे बहुउद्देशीय चक्रीवादळ निवारा केंद्र उभारण्यात येणार आहे. त्यापैकी मौजे दिघी (ता.श्रीवर्धन) येथील चक्रीवादळ निवारा केंद्र उभारण्यासाठी दिनांक १९ डिसेंबर २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रुपये ४,१०,६४,८७०.५०/- इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार रायगड जिल्ह्यातील दिघी (ता.श्रीवर्धन) आणि बोरली (ता.मुरुड) येथे बहुउद्देशीय निवारा केंद्र उभारण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

रायगड जिल्ह्यात विविध नैसर्गिक आपत्ती येत असून त्यामध्ये चक्रीवादळे, पूरग्रस्त, दरडग्रस्त तसेच रासायनिक कारखान्यांच्या वसाहतीत वायुगळती इ. चा समावेश असून त्याअनुषंगाने महाड तालुक्यातील ७२ गावांमध्ये व पोलादपूर तालुक्यातील २६ गावांमध्ये निवारा शेड बांधण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रकल्पबाधितांसाठी घरांच्या आखलेल्या योजनेत अनियमितता झाल्याबाबत

**(६४) * १५२१४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रकल्पबाधितांसाठी विविध भागात घरांच्या आखलेल्या योजनेत एका घराच्या बांधकामासाठी रुपये ८ लाख ४३ हजार एवढा खर्च येत असताना त्यासाठी रुपये ३९ लाख रुपये खर्च येत असल्याचे दाखवून सदर योजनेत अनियमितता झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्प बाधितांसाठीच्या घरांच्या योजनेत ७ हजार ४३९ घरे बांधली जाण्याची महानगरपालिकेची योजना असून त्यासाठी नियुक्त विकासकास प्रती चौरस फुटांमागे रुपये ३८ हजार इतका खर्च दिला जाणार असून त्यासह टीडीआर, क्रेडिट नोट देखील दिली जाणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका राबवित असलेल्या आश्रय योजनेत रुपये २२ लाखांत घरे बांधली जात असतानाही प्रकल्प बाधितांच्या प्रत्येक घरांसाठी रुपये ३८ ते ३९ लाख रुपयांचा खर्च येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पबाधितांसाठी घरांच्या आखलेल्या योजनेत अनियमितता करणाऱ्या दोषीं अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि, सदर प्रकरणी महानगरपालिका विरोधी पक्षनेता यांनी त्यांच्या दिनांक १९ मे, २०२२ रोजीच्या पत्रान्वये मा.लोक आयुक्त यांचेकडे तसेच, पत्रकार परिषद घेऊन कथित अनियमिततेबाबत तक्रार केली होती.

त्याअनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक २१ मे, २०२२ रोजीच्या टाईम्स ऑफ इंडिया, लोकसत्ता व महाराष्ट्र टाईम्स या स्थानिक वृत्तपत्रांत तसेच, महानगरपालिका विरोधी पक्षनेता यांना दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये सदर बाबतीत कोणतीही अनियमितता झालेली नसल्याबाबत खुलासा करण्यात आलेला असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

मुलुंड (पू.) येथील न.भू.क्र. १२८९, १२९०, १२९२, १२९३ व १२९५ या खाजगी मालकीच्या भूभागावर ७४३९ प्रकल्पबाधित सदनिका बांधण्याच्या योजनेस बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मंजुरी देण्यात आलेली आहे.

सदर भूभाग खाजगी मालकीचा असल्यामुळे, मोबदला म्हणून विकासकास जमिनीचा टीडीआर अधिक बांधकामाचा टीडीआर अधिक क्रेडिट नोटच्या स्वरुपात प्रति सदनिका अधिमूल्य रुपये ३८,००,०००/- इतकी रक्कम देण्यात येणार आहे.

(३) आश्रय योजना फक्त बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या भूखंडावर राबविण्यात येत असल्यामुळे गृहबांधणीसाठी फक्त बांधकामापोटी देय खर्च लागू होतो.

प्रकल्पबाधितांचा सदर गृहबांधणी प्रकल्प खाजगी भूखंडावर प्रस्तावित असल्यामुळे जमीन व त्यावर होणारे बांधकाम यापोटी टीडीआर, तसेच क्रेडिट नोट स्वरुपात प्रति सदनिका अधिमूल्य असा एकूण मोबदला लागू होतो.

त्यामुळे आश्रय योजनेच्या दराशी प्रकल्पबाधितांचा गृहबांधणी प्रकल्पाच्या दरांची तुलना करता येणार नाही, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली, चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यातील संजय गांधी निराधार, श्रावणबाळ, इंदिरा गांधी विधवा या योजनेंतर्गतचे लाभार्थी अनुदानापासून वंचित असल्याबाबत

**(६५) * १५६४३ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड : दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक १०५११ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: गडचिरोली, चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यातील निराधार व्यक्तींना संजय गांधी निराधार, श्रावणबाळ, इंदिरा गांधी विधवा या योजनेंतर्गत गत ५ महिन्यांपासूनचे अनुदान तालुका स्तरावर प्राप्त न झाल्याने सदर योजनेचे लाभार्थी वंचित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील विशेषत: गडचिरोली, चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यातील निराधार, दिव्यांग व विधवा महिला ह्या संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती योजना या योजनेंतर्गत लाभार्थ्यांना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेतील लाभार्थ्यांना माहे ऑक्टोबर, २०२२ पर्यंत अर्थसहाय्य वितरित करण्यात आले आहे.

तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना या योजनांचे अर्थसहाय्य माहे एप्रिल, २०२२ पासून PFMS (Public Finance Management System) प्रणालीमधूनच वितरित करण्याचे केंद्र शासनाचे निर्देश आहेत. दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ च्या शासन निर्णयान्वये केंद्र पुरस्कृत योजनांसाठी सर्व जिल्हाधिकारी यांना PFMS प्रणालीवर अनुदान वितरित करण्यात आलेले आहे. सबब, PFMS प्रणालीमधून लाभार्थ्यांना अर्थसहाय्य वितरित करताना तांत्रिक अडचणी येत असून सदर अडचणीचे निराकरण करण्याची कार्यवाही PFMS प्रणालीकडून सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यांगांच्या अनुदानित विशेष शाळा/कर्म शाळा संलग्न वसतिगृह अधीक्षक/गृहपाल यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(६६) * १५४३८ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दिव्यांगांच्या अुनदानित विशेष शाळा/कर्मशाळा संलग्न वसतिगृह अधीक्षक/गृहपाल यांना ६ व्या वेतन आयोगामध्ये ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० वेतनश्रेणी अपेक्षित असताना त्यांना ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० वेतनश्रेणी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.अध्यक्ष, राज्य वेतन सुधारणा समिती (बक्षी समिती) यांच्याकडे दिनांक २५ सप्टेंबर, २०१८ रोजी बैठक झाली असून वेतन त्रुटी उच्चस्तर समितीचा अहवाल खंड-२ दिनांक ९ फेब्रुवारी, २०२१ रोजी वित्त विभागास सादर करण्यात आला असून त्यावर मा.मंत्रिमंडळाचा निर्णय झाला आहे काय, त्यानुसार समितीचा अहवाल खंड-२ प्रसिध्द करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) असल्यास, आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी दिनांक २ मार्च, २०२२ रोजीच्या पत्रान्वये दिव्यांगांच्या अनुदानित विशेष शाळा/कर्मशाळा संलग्न वसतिगृह अधीक्षक/गृहपाल यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करणेबाबतचा शासनास सादर केलेला अहवालावर पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील दिव्यांगांच्या अुनदानित विशेष शाळा/कर्मशाळा संलग्न वसतिगृह अधीक्षक/गृहपाल यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) खरे आहे.
(२) व (३) मा.अध्यक्ष, राज्य वेतन सुधारण समिती (बक्षी समिती) यांच्याकडे दिनांक २५/०९/२०१८ रोजी बैठक झाली. वेतन त्रुटी उच्चस्तर समितीचा अहवाल खंड-२ दिनांक ९/०२/२०२१ रोजी वित्त विभागास सादर करण्यात आला असून त्यावर मा.मंत्रीमंडळाचा निर्णय झाल्यानंतर तो शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल, असे वित्त विभागाने कळविले आहे. त्यामुळे आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी दिनांक २/०३/२०२२ रोजीच्या पत्रान्वये दिव्यांगांच्या अनुदानित विशेष शाळा/कर्मशाळा संलग्न अधीक्षक/गृहपाल यांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याबाबतचा शासनास सादर केलेला अहवाल प्रतिक्षाधिन ठेवण्यात आला आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दिघा (नवी मुंबई) परिसरात जलवाहिन्या उभारुन सुरळीत पाणीपुरवठा करण्याबाबत

**(६७) * १५५६७ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिघा (नवी मुंबई) परिसरात जलवाहिन्या वारंवार फुटण्याचे प्रकार घडत असल्याने नागरिकांना अस्वच्छ पाण्याचा पुरवठा होत असल्याचे तसेच पाणी टंचाई निर्माण होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच नवी मुंबई महानगरपालिकेचे धरण असूनही दिघा परिसरात जलवाहिन्या उभारण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दिघावासियांनी जलवाहिन्या उभारुन सुरळित स्वच्छ पाणीपुरवठा करण्याबाबत शासनाकडे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिघा परिसरात जलवाहिन्या उभारुन सुरळित स्वच्छ पाणीपुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

• नवी मुंबई महानगरपालिके अंतर्गत दिघा विभागात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून (MIDC) पाणी विकत घेऊन महानगरपालिकेमार्फत त्याचे वितरण करण्यात येते. सदर कार्यक्षेत्रात ३२.२९ कि.मी. च्या जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत. त्या मार्फत वितरीत होणाऱ्या पाण्याची प्रयोग शाळेत नियमित तपासणी करण्यात येत असून, दिघा विभागात शुध्द पाणीपुरवठा करण्यात येतो.

• दिघा विभागास पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या फुटण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे.

• तथापि, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात पाणीपुरवठा करणाऱ्या जलवाहिन्या सप्टेंबर महिन्यात ३ वेळा फुटण्याचे प्रकार घडले, त्यामुळे दिघा क्षेत्रात पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता.

• सदर प्रकारानंतर पाणीपुरवठा कमी दाबाने होत होता.मात्र तद्नंतर पाणीपुरवठा सुरळीत करण्यात आला होता.

(३) • अशा आशयाची तक्रार शासनास प्राप्त झालेली नाही.

• तथापि, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात दूषित पाणी पुरवठ्याबाबत Grievance Portal व Whats App वरती तक्रारी प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेतर्फे तक्रारीचे तात्काळ निवारण करण्यात येते.

(४) • दिघा विभाग कार्यक्षेत्रात ३२.२९ कि.मी.च्या जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या असल्याने नवीन जलवाहिन्या टाकण्याची आवश्यकता नाही.

• याशिवाय, दिघा विभागाकरीता उच्चस्तरीय जलकुंभ (ESR) व भूस्तरीय जलकुंभ (GSR) बांधण्याचे काम प्रगतीपथावर असून, सदर काम पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण दिघा क्षेत्रामध्ये लागणाऱ्या पाणी साठवण्याची क्षमता वाढणार आहे. त्यामुळे जलवाहिनी फुटलेल्या कालावधीत सदर ESR व GSR मधून पाणीपुरवठा करता येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई शहर आणि राज्यातील कुष्ठरोग रुग्णांवर उपचार करुन रुग्णांची संख्या कमी करण्याबाबत

**(६८) * १६२५४ श्री.आमश्या पाडवी, श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, ॲड.अनिल परब, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या माहितीनुसार माहे एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीत मुंबईत २३६ कुष्ठरोग रुग्णांची नोंद झाली असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरामध्ये दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ ते दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत राबविण्यात आलेल्या मोहिमेमध्ये २४८ क्षय रुग्णांची व १०५ कुष्ठ रुग्णांची नोंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेने कुष्ठरुग्णांचा शोध घेण्यासाठी माहे ऑक्टोबर २०२२ मध्ये राबविलेल्या विशेष मोहिमेत आढळून आलेल्या ८८ संशयितांपैकी ८ टक्के रुग्णांना ग्रेड कुष्ठरोगाची लागण झाली असून ८८ संशयित रुग्णांमध्ये १२ बालकांचा समावेश आहे, तसेच मुंबईत आढळलेल्या कुष्ठरुग्णांपैकी ५७ टक्के रुग्ण हे अकरा विविध विभागांतील आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कुष्ठ रुग्णांची संख्या मागील वर्षीच्या तुलनेत ७० टक्के ने वाढली असून मुंबईत दर महिन्याला ४७ रुग्णांची नोंद होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई शहर आणि राज्यातील क्षय रुग्ण व कुष्ठ रुग्णांवर उपचार करुन रुग्णांची संख्या कमी करण्यासाठी /उच्चाटन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) माहे एप्रिल, २०२२ ते ऑगस्ट, २०२२ कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात २३६ नवीन कुष्ठरुग्णांची नोंद झाली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रात दिनांक २६ सप्टेंबर, २०२२ ते दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ दरम्यान संयुक्त सक्रिय कुष्ठरोग व क्षयरोग शोध मोहिमेत जनजागृतीसाठी घरोघरी आरोग्य तपासणी आणि क्षयरोग व कुष्ठरोगाच्या नवीन रुग्णांची शोध मोहिम राबविण्यात आली.

या विशेष मोहिमेत एकूण १०८ नवीन कुष्ठरोगांची व २४८ नवीन क्षयरुग्णांची नोंद झाली असून, यामध्ये १६ बाल कुष्ठरुग्ण आहेत. तसेच ८ रुग्णांना कुष्ठरोगामुळे ग्रेड २ प्रकारची विकृती झालेली आहे.

मुंबईत आढळलेल्या नवीन कुष्ठरुग्णांपैकी महानगरपालिकेच्या के/पूर्व, एम/पूर्व, एस व आर/पूर्व या चार विभागांत अंदाजित ५७ टक्के रुग्ण आढळून आले आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) मागील दोन वर्षांतील कोविड-१९ च्या लाटेमुळे राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीवर परिणाम झाल्याने नवीन कुष्ठरोग नोंद कमी झाली होती, ही वस्तुस्थिती आहे.

सबब यावर्षीच्या सक्रिय संयुक्त क्षयरोग शोध मोहिम व कुष्ठरोग शोध अभियानामध्ये सापडलेल्या कुष्ठरुग्णांच्या संख्येत तसेच दरमहा नोंद होणाऱ्या नवीन कुष्ठरुग्णांच्या संख्येमध्ये अंशत: वाढ झालेली दिसून येत असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) कुष्ठरोग व क्षयरोग आजारावर नियंत्रण तसेच त्याचे समूळ उच्चाटन करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

- राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दरवर्षी कुष्ठरोग मोहिम, सक्रिय कुष्ठरोग शोध मोहिम व क्षयरोग शोध मोहिम राबविण्यात येते.
- कुष्ठरोग व क्षयरोग यांच्याबद्दल समाजामध्ये असलेली भीती व गैरसमज दूर करण्यासाठी वर्षभर आरोग्य शिक्षणपर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.
- क्षयरुग्णांकरीता सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये, सर्वसाधारण रुग्णालये, दवाखाने व आरोग्य केंद्रांद्वारे क्षयरुग्णांकरीता निदान, उपचार, प्रतिकूल औषधांवरील उपचार, क्षयरुग्णांच्या जवळच्या व्यक्तीची वेळोवेळी तपासणी या सर्व सुविधा उपलब्ध केल्या जात आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) तालुक्यातील जवाहरलाल नेहरु बंदरामुळे बाधित प्रकल्पग्रस्तांना भूखंड देण्याबाबत

**(६९) * १५६४८ श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडको मार्फत केंद्र व राज्य शासनाने उरण (जि.रायगड) तालुक्यातील जवाहरलाल नेहरु बंदर व बंदराचे क्षेत्र वाढविण्याच्या दृष्टीने येथील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी संपादित केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जेएनपीटीमधील सिंगापूर बंदर प्राधिकरण भारत मुंबई टर्मिनल या चौथ्या बंदराच्या पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून सदर प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा मा.पंतप्रधान यांच्या हस्ते करण्यात आले असून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भूखंड इरादापत्राचे वाटप करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत किती प्रकल्पग्रस्त लाभार्थ्यांना साडे बारा टक्क्यांचे भूखंड वितरित करण्यात आले आहे व किती लाभार्थी वंचित आहेत, प्रकल्पग्रस्त लाभार्थ्यांना साडे बारा टक्क्यांचे भूखंड देण्याबाबतचे शासनाचे धोरण कधीपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उरण (जि.रायगड) तालुक्यातील जवाहरलाल नेहरु बंदरामुळे बाधित प्रकल्पग्रस्त लाभार्थ्यांना भूखंड देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नवी मुंबई प्रकल्पासाठी ता.उरण, जि.रायगड येथील जमिनी संपादित करुन सिडको महामंडळास हस्तांतरीत करण्यात आल्या होत्या. तद्नंतर सदर जमिनी जवाहरलाल नेहरु बंदरासाठी वर्ग करण्यात आलेल्या आहेत.

(२) तत्कालीन मा.पंतप्रधान महोदयांच्या हस्ते दिनांक १५/०८/२०१४ रोजी जेएनपीटी यांनी शेतकऱ्यांना भूखंड वाटपासाठी आश्वासन पत्र दिले होते.
(३) व (४) प्रकल्पग्रस्तांच्या संपादित जमिनीच्या अनुषंगाने १२.५% योजनेंतर्गत भूखंड वाटपाची पूर्ण जबाबदारी जे.एन.पी.टी. यांची आहे. शासन निर्णय, दिनांक १४/०८/२०१४ नुसार जे.एन.पी.टी.मार्फत उपलब्ध करुन दिले जाणारे क्षेत्र ताब्यात घेवून ते जे.एन.पी.टी.ने पात्र ठरविलेल्या प्रकल्पग्रस्तांना विकसित भूखंडाचे निव्वळ संगणकीय सोडतीद्वारे भूखंड इरादित करुन वाटप करणेची कार्यवाही सिडकोमार्फत केली जाते.

त्यानुसार सिडकोमार्फत ५ संगणकीय सोडती घेवून १९३ भूखंड इरादित करण्यात आले असून सध्या पात्र प्रकल्पग्रस्तांची संगणकीय सोडत घेण्याची कार्यवाही चालू आहे. आतापर्यंत सुमारे ७६% भूखंड प्रकल्पग्रस्तांना इरादित करण्यात आले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला महानगरपालिकेचा मालमत्ता कर थकीत असल्याबाबत

**(७०) * १५२९२ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला महानगरपालिकेच्या मालमत्ताधारकांकडे रुपये १७० कोटी इतका मालमत्ता कर थकीत असून सदरहू मालमत्ताधारकांकडून थकीत कर वसुली करण्याकडे कर वसुली विभाग दुर्लक्ष करीत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ च्या तिसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मालमत्ता कर थकीत असल्यामुळे त्याचा विपरित परिणाम विकास कामांवर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अकोला महानगरपालिकेच्या मालमत्ताधारकांकडून थकीत कर वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

शासनाकडून विकास कामांकरीता उपलब्धतेनुसार निधी देण्यात येतो.
(३) अकोला महानगरपालिकेकडे सन २०२२-२३ या आर्थिक वर्षातील मालमत्ता कराची थकीत मागणी रूपये १२१.९२ कोटी, चालू मागणी रूपये ७९.९० कोटी अशी एकूण मागणी २०१.८२ कोटी एवढी आहे. अकोला महानगरपालिकेकडून थकीत मालमत्ता कराचा भरणा वसुल करण्याकरीता शास्ती (व्याज) माफी अभय योजना मागील तीन वर्षात ५ वेळा राबविण्यात आली आहे. थकीत कर असणाऱ्या मालमत्तांची जप्ती व लिलावाची कार्यवाही करुन वसुली करण्यात आली आहे. स्थानिक इलेक्ट्रॉनिक मिडीया, वृत्तपत्रामधुन घंटा गाडीवरील लाऊडस्पिकरव्दारे ऑनलाईन वेबसाईटद्वारे मालमत्ता कराचा भरणा करण्याबाबत वेळोवेळी आवाहन करण्यात येते. मालमत्ता कराचा ऑनलाईन भरणा करण्याकरीता वेबसाईट कार्यान्वित करण्यात आली आहे. तसेच विभागनिहाय कॅम्प लावण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नौपाडा (जि.ठाणे) भागातील इमारतींचा मेट्रो प्रकल्पामुळे पुनर्विकास रखडल्याबाबत

**(७१) * १५६१९ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नौपाडा (जि.ठाणे) भागातील इमारतींचा पुनर्विकास नियोजित अंतर्गत मेट्रो प्रकल्पामुळे रखडला असल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे दालनात विशेष बैठक बोलावून इमारतींच्या पुनर्विकासासंदर्भात मा.आमदार, महापौर, नगरविकास विभागाचे सचिव आणि महामेट्रोच्या कार्यकारी संचालकांची समन्वय समिती स्थापन करण्याची घोषणा मा.मंत्र्यांनी पावसाळी अधिवेशन, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोन महिन्यांचा कालावधी होऊनही कोणतीही कार्यवाही झाली नसल्यामुळे जुन्या इमारतींचा पुनर्विकास रखडलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने समन्वय समिती स्थापन करुन नौपाडा (जि.ठाणे) भागातील इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय खरे आहे.

(३), (४) व (५) ठाणे शहराच्या अंतर्गत मेट्रो प्रकल्प उभारणीचा प्रस्ताव राज्य शासनाने मंजूरी प्रदान करुन केंद्र शासनास दिनांक २२/०३/२०१९ रोजी सादर करण्यात आलेला आहे. याप्रकल्पाच्या एकूण २९ कि.मी. लांबी पैकी ३ कि.मी. लांबी नौपाडा या उपशहरातून जात आहे. मेट्रो रेल्वे ॲक्ट १९७८ नुसार नवीन व जुन्या इमारतींच्या पुर्नविकासास मंजूरी ही केंद्र शासनाच्या प्रकल्प मंजूरी नंतर व भूमिगत मार्गिकेच्या पूर्णतेनंतरचे केली जाऊ शकते. तथापि, स्थानिक लोकप्रतिनिधी मार्फत जुन्या इमारतीच्या पुर्नविकास रखडल्याबाबत मार्ग काढण्याकरीता समन्वय समिती स्थापन करण्याबाबत केलेली मागणी विचारात घेऊन शासनस्तरावर अशी समिती स्थापन करण्याची बाब विचाराधीन आहे.

-----------------

## जळगाव (जि.जळगाव) शहरांतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(७२) * १५२७२ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील जळगाव महानगरपालिका शहरांतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाली असून शहरात अपघातांचे प्रमाण वाढल्याचे माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव शहरातील रस्त्यांच्या कामांसाठी गेल्या ३ वर्षात किती निधी मंजूर करण्यात आला व त्यापैकी किती खर्च करण्यात आला आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जळगाव शहरांतर्गत रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.

जळगाव महानगरपालिका क्षेत्रामध्ये अमृत योजना व भुयारी गटार योजनेंतर्गत कामासाठी मोठ्या प्रमाणावर रस्ते खोदण्यात आलेले असल्याने रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे.

मात्र, यामुळे अपघातांचे प्रमाण वाढल्याबाबतची माहिती उपलब्ध नसल्याचे जळगाव महानगरपालिकेने कळविले आहे.

(२) जळगाव महानगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांच्या पुर्नबांधणी साठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान अंतर्गत महानगरपालिकेच्या रुपये १००.०० कोटीच्या प्रस्तावास दिनांक १६/०८/२०१८ अन्वये शासनाने तत्वत: मान्यता प्रदान केलेली आहे.

त्यापैकी दिनांक २२/०३/२०२२ अन्वये, शहरातील ४९ रस्त्यांच्या पुर्नबांधणी करीता रुपये ३८.२८ कोटी रकमेस मान्यता देण्यात आली असून, या कामी कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागास नियुक्त करण्यात आले आहे. यापैकी शासनाकडून रुपये ८.९३ कोटी व महानगरपालिका हिश्यातील रुपये ५.१० कोटी याप्रमाणे पहिला हप्ता सार्वजनिक बांधकाम विभागास वर्ग करण्यात आला आहे.

(३) जळगाव शहरांतर्गत रस्त्यांच्या पुर्नबांधणीसाठी कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जबाबदारी सोपविण्यात आलेली असून, ज्या रस्त्यावरील पाणीपुरवठा व मलनि:स्सारण योजनेंतर्गतची कामे पूर्ण झालेली आहेत, त्या रस्त्यांची पुनर्बांधणीची कामे सुरु करण्यात आलेली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.